राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, पर्वरी–गोवा

# शिक्षक मार्गदर्शक (भाग २)

## पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम : बालवाटिका - १ (वयोगट ३ ते ४)



# शिक्षक मार्गदर्शक

(भाग २)

**पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम : बालवाटिका – १ (वयोगट ३ ते ४)**

# पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम : बालवाटिका – १ (वयोगट ३ ते ४)

**विकासक्षेत्र : शारीरिक विकास (अन्नमय व प्राणमय कोश विकास)**
ध्येय : CG-1 मुले त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.
क्षमता : C-1.1 पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शविते व अन्नपदार्थ वाया घालवत नाही.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | आहार | अन्नपदार्थ | १. खाण्यास योग्य आणि अयोग्य अन्नपदार्थ ओळखतो. | १. खाण्यायोग्य पदार्थांची ओळख करून देणे.<br>उदा. फळे, भाज्या, कडधान्ये, दूध, दुग्धजन्य पदार्थ, पोळी, भात इत्यादी.<br>२. खाण्यास अयोग्य अन्नपदार्थांची ओळख करून देणे.<br>उदा. चॉकलेट, आईस्क्रीम, वेफर्स, शीतपेये इ.<br>३. 'खाऊया पिऊया' खेळ खेळणे<br>४. दृक्‌श्राव्य माध्यमांच्या मदतीने योग्य व अयोग्य पदार्थांची ओळख करून देणे.<br>५. फळे आणि भाज्या बनलेल्या बोलक्या बाहुल्यांचा संवाद | अन्नपदार्थ, अन्नपदार्थांच्या प्रतिकृती, चित्रफिती, बोलक्या बाहुल्या |
| बालवाटिका १ | आहार | अन्नपदार्थ | २. मोठ्यांच्या सूचनेप्रमाणे वेगवेगळे अन्नपदार्थ खाण्यास सुरवात करतो. | १. वेगवेगळ्या अन्नपदार्थांची नावे सांगणे.<br>२. मोठ्यांच्या मदतीने वेगवेगळे अन्नपदार्थ योग्य पद्धतीने खाणे.<br>३. योग्य पद्धतीने पाणी पिणे.<br>४. अन्नपदार्थांवर आधारित गीत म्हणणे.<br>५. आवडत्या अन्नपदार्थांविषयी गप्पागोष्टी करणे.<br>६. खाद्यपदार्थांच्या चित्रांचे तक्ते लावणे.<br>७. घरून आणलेली फळे एकमेकांना वाटून खाणे. | अन्नपदार्थ, अन्पदार्थांच्या प्रतिकृती, अन्नपदार्थांची चित्रे, पाणी, गीत, तक्ते, फळे |
| बालवाटिका १ | आरोग्य | पोषक, अपायकारक अन्नपदार्थ | ३. आरोग्यास पोषक व अपायकारक अशा पदार्थांची नावे सांगतो. | १. बोलक्या बाहुल्यांचा आरोग्यास पोषक व अपायकारक पदार्थांविषयी संवाद.<br>२. पोषक व अपायकारक पदार्थ ओळखण्याचा खेळ खेळणे.<br>३. पोषक अन्नपदार्थांची नावे सांगणे. उदा. दूध, दुग्धजन्य पदार्थ, कडधान्ये, भाज्या, फळे इत्यादी.<br>४. अपायकराक अन्नपदार्थांची नावे सांगणे. उदा. बिस्किट, चॉकलेट, आईस्क्रीम. | बोलक्या बाहुल्या, अन्नपदार्थ, अन्नपदार्थांची चित्रे |

ध्येय : CG-1 मुले त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.
क्षमता : C-1.2 स्वतःची मूलभूत काळजी आणि स्वच्छता यांचा अवलंब करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | स्वच्छता | स्व-स्वच्छता, हातांची स्वच्छता | १. शौचालयाला जाण्यापूर्वी व नंतर तसेच जेवणापूर्वी व नंतर इतरांची मदत घेऊन हात धुतो आणि पुसतो. | १. हात धुण्याच्या व पुसण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखविणे.<br>२. शीशू केल्यानंतर पाणी ओतणे, हात धुणे.<br>३. स्वच्छतेवर आधारित चित्रफित दाखविणे.<br>४. स्वच्छतेसंबंधी बोलक्या बाहुल्यांचा संवाद.<br>५. जेवणापूर्वी व नंतर हात धुणे व पुसणे.<br>६. स्वच्छतेचा संदेश देणारे अभिनय गीत म्हणणे.<br>७. स्वच्छतेसंबंधी चित्रांचे तक्ते लावणे.<br>८. आरोग्य, पोषण व स्वच्छतेसंबंधी पालक प्रबोधन वर्ग घेणे. | पाणी, टॉवेल, चित्रफित, बोलक्या बाहुल्या, अभिनय गीत, तक्ते. |
| बालवाटिका १ | स्वच्छता | कपडे पादत्राणे | २. स्वतः कपडे घालतो, बटण लावण्यासाठी व स्वतःच्या पायात चप्पल, बूट घालण्यासाठी मोठ्यांची मदत घेतो. | १. कपडे घालण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक करून घेणे.<br>२. मुलाने स्वतः कपडे घालणे.<br>३. बटणे तसेच चप्पल व बूट घालण्याच्या योग्य पद्धतीचे प्रात्यक्षिक करून घेणे.<br>४. टूथब्रश, कंगवा, फणी यासारखे साहित्य वापरण्याचे प्रात्यक्षिक घेणे.<br>५. वरील सर्व कृतींची चित्रफित दाखविणे. | चित्रफित, कपडे, बूट, चप्पल, टूथब्रश, कंगवा, फणी. |

ध्येय : CG-1 मुले त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.
क्षमता : C-1.3 शाळा व वर्ग स्वच्छ आणि नीटनेटका ठेवतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | सुरक्षितता | साहित्याची निगा | १. स्वतःच्या वस्तू जसे की पिशवी, बाटली, बूट, रुमाल, खाण्याचा डबा इत्यादी बाबत सजग असतो. | १. मुलांच्या वस्तू चिन्हांकित करणे. त्यासाठी चित्रांचा वापर करणे. चिन्हांवरून मुलांनी आपल्या वस्तू ओळखणे.<br>२. वस्तू ठेवण्याच्या जागांची ओळख करून देणे.<br>३. मुलांना त्यांच्या वस्तू योग्य ठिकाणी ठेवण्याची सवय लावणे.<br>४. क्रियाकलाप संपल्यावर खेळणी व वस्तू योग्य जागी ठेवण्यास सांगणे. | चिन्हे, चित्रे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | स्वच्छता | साहित्याची स्वच्छता साहित्याची निगा | २. मोठ्यांच्या मदतीने अस्वच्छ (खरकटे), ताटल्या, भांडी ठरवलेल्या जागी ठेवणे. | १. पेला, ताटल्या, चमचे, वाट्या यासारख्या वापरलेल्या वस्तू ठेवण्यासाठी जागेवर चित्रांचा सूचना फलक लावणे.<br>२. वापरलेल्या वस्तू योग्य जागी ठेवण्याचे प्रात्यक्षिक घेणे.<br>३. न्याहारी झाल्यावर खरकटे योग्य भांड्यात टाकण्याचे प्रात्यक्षिक घेणे. | सूचना फलक, खरकटे टाकण्याचे भांडे. |
| बालवाटिका १ | स्वच्छता | कचरापेटी | ३. इतरांच्या मदतीने कचरापेटीचा वापर करतो. | १. कचरापेटीत कचरा टाकण्याचे प्रात्यक्षिक घेणे.<br>२. स्वच्छतेचे गीत म्हणणे.<br>३. वर्ग सफाईच्या कामात छोटी-छोटी कामे सांगून मुलांना सहभागी करणे.<br>४. परिसर स्वच्छतेच्या घोषणा देणे.<br>५. वर्ग स्वच्छतेसंबंधी बोलक्या बाहुल्यांचा संवाद. | कचरापेटी, गीत, घोषणा, बोलक्या बाहुल्या. |

ध्येय : CG-1 मुले त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.
क्षमता : C-1.4 वस्तू आणि सोप्या साधनांचा सुरक्षितपणे वापर करतो..

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | | | १. आग, गॅस, सुरी, इलेक्ट्रिक प्लग्ज अशा धोकादायक गोष्टींना हात लावणे टाळतो. | १. आग, गॅस, सुरी, इलेक्ट्रिक प्लग्ज यांची माहिती करून देणे.<br>२. धोकादायक वस्तूंना हात लावल्यामुळे होणाऱ्या संभाव्य परिणामांविषयी संभाषण करणे.<br>३. धोकादायक वस्तूंना हात लावल्यामुळे होणाऱ्या परिणामांच्या चित्रफिती दाखविणे. | आग, गॅस, सुरी, इलेक्ट्रिक प्लग्ज, चित्रफिती. |

ध्येय : CG-1 मुले त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.
क्षमता : C-1.5 हालचालींमध्ये सुरक्षिततेबद्दल जागरुकता दाखवून योग्यरित्या कृती करतो. (चालणे, धावणे, सायकल चालवणे)

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | सुरक्षितता | रस्ता सुरक्षितता | १. रस्त्यावरील सुरक्षितता महत्त्वाची आहे हे ओळखतो, रस्त्याने मोठ्यांचा हात पकडून चालतो. | १. रस्त्यावरून सुरक्षितपणे चालण्याविषयी मुलांशी संभाषण करणे.<br>२. रस्त्यावरून मोठ्यांचा हात धरून कसे चालावे याचे प्रात्यक्षिक दाखविणे.<br>३. रस्त्यावरून सुरक्षित पद्धतीने चालण्यासंबंधी चित्रफित दाखविणे.<br>४. रस्त्यावरून सुरक्षितपणे चालण्याविषयीचे चित्रांचे तक्ते लावणे. वाहतुकीचे सूचना फलक दाखविणे. | चित्रफित, , चित्रांचे तक्ते, वाहतुकीचे सूचना फलक |

ध्येय : CG-1 मुले त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.
क्षमता : C-1.6 असुरक्षित/ धोकादायक परिस्थिती जाणतो आणि मदत मागतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | सुरक्षितता | स्व-सुरक्षा | १. परिचित आणि अपरिचित व्यक्ती, यांतील फरक ओळखतो. | १. संभाषणाद्वारे मुलांना परिचित आणि अपरिचित लोकांविषयी माहिती देणे.<br>२. दृक्‌श्राव्य माध्यमांद्वारे चित्रफित दाखवून परिचित व अपरिचित लोकांची ओळख करून देणे.<br>३. परिचित आणि अपरिचित लोकांना जाणून घेऊन त्यांच्याशी कसे वर्तन करावे याविषयी बोलक्या बाहुल्यांचा संवाद. | चित्रिफित, बोलक्या बाहुल्या. |

ध्येय : CG-2 मुले ज्ञानेंद्रियांची संवेदनक्षमता आणि कुशाग्रता विकसित करतात.
क्षमता : C-2.1 आकार, रंग आणि त्याच्या छटा यांच्यामधील फरक ओळखतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | ज्ञानेंद्रिय | रंगांची ओळख | १. मूळ प्राथमिक रंग (लाल, निळा आणि पिवळा) आणि परिसरातील इतर रंग यांच्यातील फरक ओळखतो आणि त्यांची नावे सांगतो (काळा, पांढरा, तपकिरी) | १. प्राथमिक रंग दाखविणे, त्यांची नावे सांगणे.<br>२. प्राथमिक रंगांपासून तयार होणाऱ्या इतर रंगांची माहिती देणे.<br>३. वेगवेगळ्या रंगांची चित्रे दाखवून त्यांची नावे ओळखण्यास सांगणे.<br>४. मेणाच्या रंगांनी आकृती रंगविणे.<br>५. रंगांचे गाणे म्हणणे. | प्राथमिक रंग, विविध रंगांच्या वस्तू, चित्रे, मेणाचे रंग, रंगांचे गाणे. |
| बालवाटिका १ | ज्ञानेंद्रिय | रंगांची ओळख विभागणी | २. वस्तूंची त्यांच्या रंगानुसार विभागणी/ गट करतो.<br>(उदा. सगळ्या लाल वस्तू एकत्रित करतो.) | १. सांगितलेल्या रंगांच्या वस्तू उचलणे.<br>२. रंगानुसार वस्तूंची विभागणी करून त्यांना वेगवेगळ्या पात्रांत ठेवणे. | विविध रंगांच्या वस्तू, पात्रे |

ध्येय : CG-2 मुले ज्ञानेंद्रियांची संवेदनक्षमता आणि कुशाग्रता विकसित करतात.
क्षमता : C-2.2 चिन्हे आणि प्रतीके यांकरिता दृक्‌स्मृती (Visual Memory) विकसित करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | ज्ञानेंद्रिय | दृक्‌स्मृती | १. दोन सारखे आकार, चिन्हे यांच्या समान दिशानुसार जोड्या लावतो.<br>+ <-----> +<br>∞ <-----> ∞ | १. दोन समान आकारांच्या जोड्या लावणे.<br>२. दोन समान चिन्हांच्या जोड्या लावणे.<br>३. प्राणी आणि त्यांच्या सावल्या यांच्या योग्य जोड्या लावणे. | समान आकार, समान चिन्हे, प्राणी, सावल्या, कार्यपुस्तिका. |

ध्येय : CG-2 मुले ज्ञानेंद्रियांची संवेदनक्षमता आणि कुशाग्रता विकसित करतात.
क्षमता : C-2.3 आवाजातील चढ-उतार (आरोह-अवरोह) सूर-ताल-लय यांनुसार आवाजातील फरक ओळखतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | ज्ञानेंद्रिय | आवाजाची ओळख | १. मानव, प्राणी, पक्षी, वाहने, टाळ्या यांचा आवाज, पाण्याचा आवाज, वस्तूंचा आवाज इत्यादी वातावरणातील आवाज यातील वेगळेपणा ओळखतो. | १. शिक्षिकेने विविध प्राणी व पक्षी यांचे आवाज काढणे. मुलांनी त्याचे अनुकरण करणे.<br>२. प्राणी व पक्षी यांचे आवाज असलेली गाणी म्हणणे.<br>३. मोबाईलवरून निसर्गातील पाऊस, थेंब, वाहते पाणी, लाटा, वारा यांचे आवाज ऐकवणे ते आवाज ओळखणे.<br>४. शरीराच्या अवयवांचे आवाज काढणे. उदा. टाळ्या, बोटांच्या चुटक्या, पाय आपटणे.<br>५. विविध वाहनांचे आवाज ऐकणे व ओळखणे.<br>६. आवाज डब्यातील मणी, दगड, नाणी, वाळू यांचे आवाज ऐकणे. | गाणी, मोबाईल, विविध आवाज, वाहनांचे आवाज, आवाज डब्या. |
| बालवाटिका | ज्ञानेंद्रिय | आवाजाची ओळख | २. कर्कश व मृदू आवाजातील फरक करतो. | १. मुलांना कर्कश आवाज ऐकवणे. उदा. डब्यावर काठीचा आघात करणे.<br>२. मृदू आवाजाची ओळख करून देणे. उदा. हळू आवाजात बोलणे, नम्रतेने बोलणे.<br>३. मोबाईलवरून विविध मृदू व कर्कश आवाज ऐकवणे. मुलांना त्यातील फरक ओळखण्यास सांगणे. | डबा, काठी, मोबाईल, विविध आवाज. |

ध्येय : CG-2 मुले ज्ञानेंद्रियांची संवेदनक्षमता आणि कुशाग्रता विकसित करतात.
क्षमता : C-2.4 वेगवेगळे गंध आणि चव यातील फरक ओळखतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | ज्ञानेंद्रिय | गंधओळख | १. सुगंध आणि दुर्गंध ओळखतो उदा. अत्तर, फुले, कचरा इत्यादी | १. वेगवेगळ्या वस्तूंचा गंध घेण्याचा अनुभव देणे.<br>२. लवंग, लसूण, आले, जिरे, बडीशेप, मिरी, हिंग यांसारख्या वस्तू कुटून त्यांचा गंध देणे.<br>३. तुळस, कडुलिंब, गवती चहा, अडुळसा या वनस्पतींचा गंध घेणे.<br>४. अगरबत्ती, डेटॉल, अत्तर इत्यादींचा गंध देणे.<br>५. सुगंध व दुर्गंध याविषयी मुलांशी गप्पागोष्टी करणे व त्यातील फरक लक्षात आणून देणे.<br>६. हवा असणारा गंध म्हणजे सुगंध, नकोसा असणारा गंध म्हणजे दुर्गंध, हे प्रात्यक्षिकाद्वारे स्पष्ट करणे.<br>उदा. अत्तराचा सुगंध फुलांचा सुगंध, कचऱ्याचा दुर्गंध. | विविध गंधांच्या वनस्पती, विविध वस्तू, अगरबत्ती, डेटॉल, अत्तर, फुले, कचरा. उदा. अत्तराचा सुगंध, फुलांचा सुगंध, कचऱ्याचा दुर्गंध |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका | ज्ञानेंद्रिय | चवीची ओळख | २. गोड, आंबट, खारट, कडू, तुरट, तिखट चव ओळखतो. | १. वेगवेगळ्या वस्तू व पदार्थ यांची प्रत्यक्ष चव घेण्याची संधी मुलांना देणे व त्या चवीचे नाव सांगणे.<br>उदा. साखर, गूळ, लाडू, चिंच, मीठ, कारले, आवळा इ.<br>२. शिक्षिकेने चव सांगणे व मुलांनी त्या चवीचे पदार्थ सांगणे. | विविध चवींचे पदार्थ, साखर, गूळ, लाडू, चिंच, मीठ, कारले, आवळा |

ध्येय : CG-2 मुले ज्ञानेंद्रियांची संवेदनक्षमता आणि कुशाग्रता विकसित करतात.
क्षमता : C-2.5 विविध प्रकारच्या स्पर्शांमधील फरक करण्याची क्षमता विकसित होते.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | ज्ञानेंद्रिय | स्पर्श ओळख | १. कठीण/ कडक, मऊ, गार, गरम, खरखरीत खडबडीत, गुळगुळीत स्पर्शांमधील फरक समजतो. | १. विविध प्रकारच्या स्पर्शांचा अनुभव देणे.<br>२. प्रात्यक्षिकासह विविध स्पर्शांमधील फरक दाखवणे.<br>उदा. दगड-कडक, कापूस-मऊ, बर्फ-गार, पाणी-गरम, सॅण्डपेपर-खरखरीत, संगमरवर-गुळगुळीत, दगड-खडबडीत इ. | दगड, कापूस बर्फ, पाणी सॅण्डपेपर, संममरवर |

ध्येय : CG-2 मुले ज्ञानेंद्रियांची संवेदनक्षमता आणि कुशाग्रता विकसित करतात.
क्षमता : C-2.6 अनुभवांची सर्वकष जाणीव होण्याकरिता ज्ञानेंद्रियामार्फत प्राप्त संवेदनांचे एकात्मिकरण करण्यास सुरुवात करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | उपघटक | श्वसनाचे व्यायाम | १. जोराने श्वास बाहेर सोडतो (उच्छ्वास) | १. शिक्षिकेने जोरात श्वास सोडण्याचे (उच्छ्वास) प्रात्यक्षिक करून दाखविणे.<br>२. श्वास कसा जोरात सोडावा हे समजावून सांगणे.<br>३. मुलांना श्वास जोरात सोडण्यास सांगणे.<br>४. लांब श्वास घेणे व जोरात श्वास सोडणे ही कृती २ ते ३ वेळा करून घेणे.<br>५. अल्पकाळासाठी मांडी घालून, डोळे मिटून शांत बसणे.<br>६. प्राणायाम करणाऱ्या साधकांची चित्रे दाखविणे. | प्राणायाम करणाऱ्या साधकांची चित्रे |

ध्येय : CG-3 सुदृढ आणि लवचिक शरीर विकसित होते.
क्षमता : C-3.1 विशिष्ट कृती करताना ज्ञानेंद्रियांच्या संवेदना व शारीरिक हालचाली यांत समन्वय दर्शवतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | कारक कौशल्य Motor skills | स्थूल स्नायू विकास | १. चेंडू पकडणे, फेकणे आणि चेंडू लाथेने उडविणे (घळलज्ञ) या कृती नियंत्रणाद्वारे करतो. | १. फुग्यांनी व हलक्या वजनाच्या चेंडूने मुक्तपणे खेळणे.<br>२. शिक्षिकेने मोठ्या आकाराचा, हलक्या वजनाचा चेंडू मुलाच्या दिशेने घरंगळत फेकणे. मुलाने तो पकडणे व फेकणे.<br>३. मुलांनी टप्पा पडत आलेला चेंडू झेलण्याचा प्रयत्न करणे.<br>४. चेंडू/ फुगा/ रिंग दोन्ही हातांनी समोरच्या दिशेने फेकणे.<br>५. चेंडू/ फुगा/ रिंग वरच्या दिशेने फेकणे.<br>६. चेंडू/ रिंग जमिनीवर काढलेल्या रिंगणात फेकणे.<br>७. मोठ्या आकाराचा चेंडू पायाने ढकलणे (Kick) | फुगे, चेंडू, रिंग, रिंगण |

ध्येय : CG-3 सुदृढ आणि लवचिक शरीर विकसित होते.
क्षमता : C-3.2 विविध शारीरिक कृतींमध्ये तोल, समन्वय आणि लवचिकता दर्शवतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | कारक कौशल्य Motor skills | संतुलन | १. आधाराने किंवा मदतीने एका पायावर उभा राहू शकतो. | १. वर्तुळात ठेवलेल्या ध्वजाभोवती धावणे.<br>२. नागमोडी रेषेवरून धावणे.<br>३. हात वर करून दोन्ही पायांच्या चवड्यावर उभे राहणे.<br>४. हात आणि पायऱ्यांचा उपयोग करून प्राण्यांसारखे चालणे (बेडूक, ससा, हत्ती).<br>५. एक-दोन, एक-दोन म्हणत कदमताल करणे. | ध्वज, नागमोडी रेषा |
| बालवाटिका १ | कारक कौशल्य | संतुलन | २. अल्प काळासाठी एका पायावर संतुलन साधू शकतो. | १. हात बाजूला असलेल्या स्थितीत एका पायावर तोल सांभाळणे.<br>२. हात वर असलेल्या स्थितीत एका पायावर तोल सांभाळणे.<br>३. अल्पकाळासाठी एका पायावर उभे राहून ध्रुवासन करणे.<br>४. तोल सांभाळण्याची कृती असलेले खेळ खेळणे.<br>५. झोपाळ्यावर झुलणे.<br>६. कोणत्याही एका पायावर उभे राहणे. | झोपाळा, खेळ |

ध्येय : CG-3 सुदृढ आणि लवचिक शरीर विकसित होते.
क्षमता : C-3.3 हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवितो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका<br>१ | कारक<br>कौशल्य | सूक्ष्म स्नायू<br>विकास हस्तनेत्र<br>समन्वय | १. साध्या कृतींमध्ये सूक्ष्म स्नायू विकास, हस्त-नेत्र समन्वय आणि स्नायूंमधील बळकटपणा दर्शवितो. (उदा. गिरगिटणे, कागद फाडणे, चिकटविणे, मुक्तपणे रंगविणे, मातीकाम करणे) | १. अंगठा आणि शेजारचे बोट यांचा वापर करून धान्य निवडणे.<br>२. ठोकळे, दगड, बिया यांसारख्या परिसरातील उपलब्ध वस्तू गोळा करून त्यांच्या साध्या रचना तयार करणे.<br>३. कागदाच्या सोप्या घड्या घालणे.<br>४. दिलेल्या आकारबंधात रांगोळी किंवा रेती भरणे.<br>५. छिद्रात छोट्या वस्तू बसविणे.<br>६. ठोकळे, रिंग यांसारख्या वस्तूंचे मनोरे बनविणे.<br>६. रांगोळी, माती, वाळू यात काडीने गिरगिटणे.<br>८. रद्दीचे कागद फाडणे.<br>९. दिलेल्या आकारबंधात वेगवेगळ्या वस्तू चिकटवणे.<br>१०. ठोकळ्यांचे, पानांचे, कापलेला बटाटा-कांदा-भेंडी यांचे ठसेकाम करणे.<br>११. भिंतीवर मुलांसाठी राखून ठेवलेल्या जागेत खडूने रेघोट्या मारणे.<br>१२. चित्रात रंग भरणे.<br>१३. ढेकळे फोडणे, माती चाळणे, माती-पीठ मळणे, मातीचे गोळे तयार करणे.<br>१४. परिसरात उपलब्ध असलेल्या वस्तू एकत्र जमवून त्या वेगवेगळ्या पात्रात ठेवणे. (उदा. फुले, पाने, बिया, चिंचोके)<br>१५. दोरीला धरून लोंबकळणे.<br>१६. गिरकी घेणे.<br>१७. एका हाताने ग्लास, पेला पकडणे.<br>१८. चिमटा वापरून वाटी, पेला, प्लेट इत्यादी वस्तू उचलणे.<br>१९. मोठे मणी ओवणे.<br>२०. बोथट कात्रीने कागद कापणे.<br>२१. रुमालाला गाठ मारणे व सोडविणे.<br>२२. चमच्यातील पदार्थ न सांडता चमचा पकडणे.<br>२३. बटणे लावणे | धान्य ठोकळे, दगड, बिया, कागद, रांगोळी, रेती, छिद्रपट्टी, रिंग, माती, वाळू, बटाटा, कांदा, भेंडी, खडू, चित्रे, मेणाचे रंग, ढेकळे, पीठ, पाणी, फुले, पाने, बिया, चिंचोके, दोरी, ग्लास, पेला, चिमटा, वाटी, प्लेट, मणी, रुमाल, चमचा, कात्री, कागद, बटणे |

ध्येय : CG-3 सुदृढ आणि लवचिक शरीर विकसित होते.
क्षमता : C-3.4 एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना आणि धावताना सामर्थ्य आणि चिकाटी दाखवतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | कारक कौशल्य | चालणे | १. सरळ रेषेत चालतो | १. योग्य शरीरस्थिती ठेवून समोरच्या दिशेने सरळ रेषेत चालणे.<br>२. हात वर धरून, बाजूला धरून सरळ रेषेत चालणे.<br>३. टाळ्या वाजवत (वर, खाली) सरळ रेषेत चालणे.<br>४. सैनिकासारखा कदमताल करीत चालणे. | शिट्टी, कदमतालची धून |
| बालवाटिका १ | कारक कौशल्य | चालणे | २. उलट चालतो | १. योग्य शरीरस्थिती ठेवून उलट (मागे) चालणे. | |
| बालवाटिका १ | कारक कौशल्य | चालणे | ३. पायाच्या चवड्यावर चालतो. (६ पेक्षा अधिक पावले) | १. योग्य शरीर स्थिती ठेवून, तोल सांभाळत चवड्यावर चालणे. | |
| बालवाटिका १ | कारक कौशल्य | चालणे | ४. दिशा व गती बदलून सहजतेने चालतो किंवा धावतो. | १. चालता चालता वेग वाढवणे, कमी करणे, खूप सावकाश चालणे, खूप जास्त वेगाने चालणे.<br>२. सरळ धावणे, गोलात धावणे.<br>३. आधी सावकाश व मग वेग वाढवत धावणे. | |
| बालवाटिका १ | कारक कौशल्य | उड्या मारणे | ५. एका जागी उड्या मारतो. छोट्या अडथळ्यावरून उडी मारतो. | १. एका जागेवर उड्या मारणे.<br>२. विविध आवाज करत जागेवर उड्या मारणे.<br>३. कमी उंच व जास्त उंड उड्या मारणे.<br>४. कमरेवर हात ठेवून उड्या मारणे.<br>५. संगीताच्या तालावर उड्या मारणे.<br>६. उडी मारल्यावर हवेत असताना टाळी वाजवणे.<br>७. छोट्या अडथळ्यावरून उडी मारणे. | संगीत, टायर, लाकडी वस्तू (छोटी) |
| बालवाटिका १ | कारक कौशल्य | उड्या मारणे | ६. उंचावरून उडी मारून पायावर स्थिर उभा राहतो. (उंची २½ ते ३ फूट) | १. एक ते दीड फूट उंचीच्या छोट्या पेटीवरून खाली उडी मारून स्थिर राहणे.<br>२. अडीच ते तीन-तीन फूट उंचीच्या छोट्या टिपॉयवरून खाली उडी मारून स्थिर राहणे. | पेटी, टिपॉय |
| बालवाटिका १ | कारक कौशल्य | वजन उचलणे | ७. हलकी वजने उचलू शकतो, हालचाल करू शकतो. (जसे लहान मग घेऊन एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी जाऊ शकतो.) | १. भांडे, वस्तूंची पिशवी, छोटी बादली, तांब्या यांसारख्या वस्तू एका जाग्यावरून दुसऱ्या जागी नेणे.<br>२. वस्तू घेऊन आखलेल्या रेषेपर्यंत जाण्याचा खेळ खेळणे. | भांडे, वस्तूंची पिशवी, बादली, तांब्या |

**विकास क्षेत्र : सामाजिक, भावनिक आणि नैतिक विकास (मनोमय कोश विकास)**

ध्येय : CG-4 मुले भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात, म्हणजे त्यांच्या स्वतःच्या भावना समजून घेऊन त्याचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करतात.

क्षमता : C-4.1 कुटुंब आणि समाजातील एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | जीवन कौशल्य | स्व-ओळख | १. स्वतःची स्वतंत्र (Unique) व्यक्ती म्हणून ओळख दर्शविती आणि आवड सांगतो. (उदा. आवडता शर्ट, बॅग, वस्तू) | १. मुलांच्या आवडत्या वस्तू, खेळणी, पदार्थ याविषयी गप्पा करणे.<br>२. मुलांनी स्वतःच्या वस्तू ओळखणे.<br>३. भातुकलीचा खेळ खेळणे.<br>४. बोलक्या बाहुल्यांचा आपल्या आवडीनिवडी विषयी संवाद. | भातुकलीच्या खेळातील वस्तू, बोलक्या बाहुल्या |
| बालवाटिका १ | जीवन कौशल्य | स्व-ओळख | २. स्वतःचे नाव व आडनाव सांगतो. | १. संभाषण करताना मुलांना प्रश्न विचारणे. मुलांनी आपले नाव व आडनाव सांगणे.<br>२. शिक्षकांनी मुलांच्या आवडीचे चित्र व त्याच्या नावाचे कार्ड तयार करणे. मुलांनी काही दिवस ते कार्ड पेटीत टाकून हजेरी देणे. | चित्र व नावाचे कार्ड |

ध्येय : CG-4 मुले भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात, म्हणजे त्यांच्या स्वतःच्या भावना समजून घेऊन त्याचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करतात.

क्षमता : C-4.2 विविध भावना ओळखतो. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | भावनिक विकास | स्व-च्या भावना व्यक्त करणे. | १. स्वतःला काय हवे आहे ते सांगतो आणि स्वतःच्या भावना ओळखतो. जसे आज मला चित्र रंगवायचे नाही. मला बाहेर जायचे आहे. | १. आवडीच्या अध्ययन कोपऱ्यात मुलांना खेळण्याची व एकमेकांशी बोलण्याची संधी देणे.<br>२. मुलांच्या आवडी-निवडी व भावना जाणून घेण्यासाठी गप्पागोष्टी करणे. | अध्ययन कोपरे |
| बालवाटिका १ | भावनिक विकास | भावना ओळखणे | २. सोप्या भावना ओळखतो. जसे- भीती, आनंद, दुःख | १. भावनांची अभिव्यक्ती असणाऱ्या चित्रफिती दाखविणे,<br>२. विविध भावना व्यक्त करणाऱ्या मुलांची चित्रे दाखवून भावना ओळखण्यास सांगणे.<br>३. मुलांच्या दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटना व व्यक्त होणाऱ्या भावना यांविषयी संभाषण करणे.<br>३. विविध भावनांची अभिव्यक्ती करणारी गोष्ट सांगणे व गोष्टीत व्यक्त झालेल्या भावनांविषयी त्यांना बोलते करणे. | चित्रफित, चित्रे, गोष्ट. |

ध्येय : CG-4 मुले भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात, म्हणजे त्यांच्या स्वतःच्या भावना समजून घेऊन त्याचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करतात.
क्षमता : C-4.3 इतर मुले आणि प्रौढ यांच्याशी सहजतेने संवाद साधतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | सामाजिक विकास | व्यक्ती परिचय प्रेम | १. कुटुंबातील जवळच्या ठराविक सदस्यांना ओळखतो, नावे सांगतो. | १. मुलांनी आपल्या कुटुंबाचे छायाचित्र आणणे व कुटुंबातील जवळच्या सदस्यांची नावे सांगणे. त्यांच्याविषयी बोलणे.<br>२. प्रदर्शनी फलकावर कुटुंबाची छायाचित्रे लावणे. मुलांना त्यांविषयी एकमेकांशी बोलण्याची संधी देणे. | छायाचित्र |
| बालवाटिका १ | भावनिक विकास | परिचित मोठ्या व्यक्तिंशी बोलणे | २. परिचित मोठ्या व्यक्तिंशी सहजतेने संवाद साधतो. | १. मुलांना शाळेतील ताई/ शिक्षक/ सेविका यांना निरोप देऊन बोलावून आणण्याची संधी देणे.<br>२. मुलांनी शेजाऱ्यांना शुभेच्छा देणे. | |
| बालवाटिका १ | सामाजिक विकास | इतरांत मिसळणे | ३. वर्गामध्ये पालकांशिवाय किंवा कुटुंबातील मोठ्या व्यक्ती शिवाय सहजपणे राहतो. | १. वर्गात सहज दिसतील अशा जागी खेळणी मांडणे. मुलांना मुक्तपणे खेळण्याची संधी देणे.<br>२. खेळ, गाणी, गोष्टी यांसारख्या उपक्रमांतून वर्गात आनंदी वातावरण निर्माण करणे. | खेळणी, खेळ, गाणी, गोष्टी |

ध्येय : CG-4 मुले भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात, म्हणजे त्यांच्या स्वतःच्या भावना समजून घेऊन त्याचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करतात.
क्षमता : C-4.4 इतर मुलांबरोबर सहकार्याच्या वृत्तीने वागतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | सामाजिक विकास | इतरांशी खेळणे, इतरांत मिसळणे | १. इतर मुलांसोबत खेळायला सुरुवात करतो. | १. मुलांना इतरांबरोबर लपाछपी, चेंडू फेकणे व पकडणे यांसारखे खेळ खेळण्याची संधी देणे.<br>२. संगीताच्या तालावर एकमेकांचे हात हातात धरून गोलाकार फिरणे.<br>३. एकमेकांच्या खांद्यावर दोन्ही हात ठेवून आगगाडीचा खेळ खेळणे. आगगाडीचे गाणे म्हणणे.<br>४. वाळूत इतरांसोबत रचनाकृती तयार करणे. | चेंडू, गाणे, वाळू |

ध्येय : CG-4 मुले भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात, म्हणजे त्यांच्या स्वतःच्या भावना समजून घेऊन त्याचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करतात.
क्षमता : C-4.5 शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | सामाजिक विकास | शिस्त सदाचार नैतिकता | १. दैनंदिन कृतीमध्ये सहभागी होतो. | १. प्रार्थनेच्या वेळी नीट बसणे आणि सहभागी होणे.<br>२. दैनंदिन क्रियाकलापात सहभागी होण्यासाठी मुलांना प्रोत्साहन देणे.<br>३. मैदानावर जाताना रांगेत जाणे. | क्रियाकलाप, प्रार्थनासभा |
| बालवाटिका १ | सामाजिक विकास | शिस्त, सदाचार, नैतिकता | २. शिक्षकांच्या मदतीने साध्या सूचनांचे पालन करतो. | १. मुलांना दोन ते तीन शब्दांत सूचना देणे. उदा. खाली बसा, उभे रहा, डबा उघडा, हात धुवा इत्यादी.<br>२. 'सैनिक म्हणतो' हा खेळ खेळणे. सैनिक म्हणतो टाळी वाजवा, सैनिक म्हणतो हात वर, सैनिक म्हणतो उडी मारा. मुलांनी ती ती कृती करणे. | खेळ |

ध्येय : CG-4 मुले भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात, म्हणजे त्यांच्या स्वतःच्या भावना समजून घेऊन त्याचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करतात.
क्षमता : C-4.6 गरजेच्या वेळी इतरांना (प्राणी आणि वनस्पतीसह) मदत करतो आणि दयाभाव दर्शवितो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | सामाजिक विकास | आपुलकी प्रेम मदत | १. इतर बालके आणि प्रौढांप्रती आपुलकी दाखवितो. | १. खेळताना मित्रांना खेळणी देणे.<br>२. डबा न आणलेल्या मित्राला खाऊ देण्यासाठी प्रोत्साहन देणे.<br>३. आजी-आजोबांचे पाय चेपणे.<br>४. इतरांची सेवा करणाऱ्या व्यक्तींच्या गोष्टी सांगणे.<br>५. 'सेवा', 'मदत' या गुणांचे दर्शन घडविणारी चित्रफित दाखवणे. | खेळणी, डबा, चित्रफित, गोष्टी |

ध्येय : CG-4 मुले भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात, म्हणजे त्यांच्या स्वतःच्या भावना समजून घेऊन त्याचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करतात.
क्षमता : C-4.7 इतर बालकांचे विचार, त्यांचे प्राधान्य व भावनिक गरजा लक्षात गेऊन त्यांना सकारात्मक प्रतिसाद देतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | सामाजिक विकास | नैतिकता समानता समरसता | १. बालक सर्व मुलांशी त्यांच्या पार्श्वभूमी व क्षमतांबद्दल विचार न करता खेळतो व संवाद साधतो. | १. समूहात खेळणे.<br>२. समूहनृत्यात सहभागी होणे.<br>३. गटशः अध्ययन कोपऱ्यातील क्रियाकलापात सहभागी होण्याची संधी निर्माण करणे. | खेळ, समूहनृत्य, अध्ययन, कोपरे |

ध्येय : CG-5 उत्पादक कार्याबाबत व सेवेबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात.
क्षमता : C-5.1 इतरांना मदत करण्यासाठी वयानुरुप सुयोग्य शारीरिक श्रम करण्याची तयारी दर्शवितो आणि त्यामध्ये सहभागी होतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | सामाजिक विकास | श्रम<br>सेवा<br>नैतिकता | १. खेळून झाल्यावर खेळणी आणि इतर साहित्य जागच्या जागी ठेवतो. | १. क्रियाकलाप झाल्यावर खेळणी व इतर वस्तू योग्य जागेवर ठेवण्यास सांगणे.<br>२. मदत आणि सेवा करण्याचा संदेश देणारी गोष्ट सांगणे.<br>३. क्रियाकलाप झाल्यावर पडलेले कागदाचे तुकडे कचरापेटीत टाकणे. | खेळणी, वस्तू, गोष्ट, कचरापेटी |

ध्येय : CG-6 मुले स्वत:भोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शवितात.
क्षमता : C-6.1 सर्व प्रकारच्या जीवांबाबत काळजी घेतो व त्यांच्यासोबत राहण्याबाबत आनंद प्रकट करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | पर्यावरण | वृक्ष, पशु, पक्षी | १. वनस्पती आणि प्राण्यांचे निरीक्षण करताना कुतुहल दर्शवितो. | १. निसर्गभ्रमणासाठी नेणे.<br>२. झाडे, प्राणी, पक्षी यांच्याविषयी माहिती देणे.<br>३. झाडे, प्राणी, पक्षी यांच्या चित्रफिती दाखविणे.<br>४. झाडे, प्राणी, पक्षी यांच्यावर आधारित गाणी म्हणणे, गोष्टी सांगणे.<br>५. प्राण्यांच्या व पक्ष्यांच्या प्रतिकृती दाखवून त्यांचे निरीक्षण करण्यास सांगणे व त्यांविषयी गप्पागोष्टी करणे.<br>६. वनस्पती, प्राणी व पक्षी यांविषयी बोलक्या बाहुल्यांचा संवाद | झाडे, पक्षी, प्राणी, चित्रफिती, प्रतिकृती, बोलक्या बाहुल्या |

**विकासक्षेत्र : बोधात्मक विकास (विज्ञानमय कोश विकास)**
ध्येय : CG-7 : मुले निरीक्षण व वार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.
क्षमता : C-7.1 : वेगवेगळ्या वर्गातील/ गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करतो व समजून घेतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | सृष्टी परिचय | नावे | १. वस्तू, व्यक्ती, चित्रे, प्राणी, पक्षी, घटना या इतरांच्या मदतीने नावासहित ओळखतो. | १. वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी, घटना यांची चित्रे दाखवून त्यांची नावे सांगणे.<br>२. चित्रफित दाखवून विविध वस्तू, व्यक्ती, प्राणी, पक्षी, घटना यांची नावे सांगणे व त्यांची ओळख करून देणे.<br>(उदा. ससा, मांजर, हत्ती, वाघ, कावळा, डॉक्टर, विमान, ताट, झाड, पान, फूल इत्यादी)<br>३. दाखविलेल्या वस्तूंची किंवा प्राणी, पक्षी, व्यक्ती यांच्या चित्रांची मुलांनी नावे सांगणे. | चित्रे, चित्रफित |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | सृष्टी परिचय | आकाराची ओळख | २. परिचित वस्तूंच्या चित्रातील हरवलेला भाग ओळखतो. | १. वस्तू, प्राणी, पक्षी यांच्या चित्रांचे कापलेले भाग जोडून चित्र पूर्ण करणे. | चित्रे |
| बालवाटिका १ | सृष्टी परिचय | श्रेणीबद्ध संबंध | ३. गटामधील श्रेणीबद्ध संबंध ओळखतो.<br>उदा. प्राणी आणि त्यांची पिले) | १. प्राणी, पक्षी आणि त्यांची घरे यांच्या जोड्या जुळवणे.<br>२. प्राणी आणि त्यांची पिले यांच्या जोड्या जुळवणे. | चित्रे, कृतिपत्रिका |

ध्येय : CG-7 : मुले निरीक्षण व वार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.
क्षमता : C-7.2 : निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन तो दर्शविणारी साधी परिकल्पना मांडतो व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/ पडताळणीकरिता निरीक्षणाचा आधार घेतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | कार्यकारण भाव | निरीक्षण, प्रयोग | १. निरीक्षणावर आधारित कल्पनांचा किंवा युक्त्यांचा उपयोग करतो. (उदा. गरम अन्नावर फुंकर घालण्याच्या प्रौढांच्या कृतीचे अनुकरण करतो.) | १. पंख्याने हवा घेणे.<br>२. समई पेटविताना पंखा बंद करणे.<br>३. हाताचे डाग जाण्यासाठी पाणी व साबण यांचा उपयोग करणे.<br>४. दोरीवरील कपडे पडू नयेत यासाठी चिमटे लावणे.<br>५. मुलांनी स्वतः नवीन कल्पना व युक्त्यांचा वापर करणे.<br>६. कार्यकारणभावाविषयी मुलांशी चर्चा करणे.. | पंखा, समई, साबण, पाणी, चिमटे |
| बालवाटिका १ | कालमापन | दिवस आणि रात्र | २. दिवस-रात्रीत फरक करतो. | १. वर्गाच्या खोलीत प्रात्यक्षिकाद्वारे उजेड व अंधार करून दिवस व रात्रीची संकल्पना स्पष्ट करणे.<br>२. रात्र आणि दिवसाचे दर्शन घडविणारी चित्रफित दाखविणे.<br>३. दिवसा आणि रात्री मुलांना कसे वाटते, कोणते अनुभव येतात याविषयी गप्पागोष्टी करणे.<br>४. दिवसा आणि रात्री आपण कोणत्या कृती करतो याविषयी संभाषण.<br>५. दिवस आणि रात्र बनून बोलक्या बाहुल्यांचा संवाद. | चित्रफित, बोलक्या बाहुल्या |
| बालवाटिका १ | तौलनिक संकल्पना | वस्तूंची, गोष्टींची आवड-निवड | ३. आवड-निवडीनुसार प्राधान्यक्रम ठरवतो. | १. मुलाच्या ओळखीच्या वस्तूंचे, दोन दोनचे गट मांडणे. मुलाने त्यातील आवडणारी वस्तू निवडणे. उदा. रंग, ठोकळे, खेळणी, खाद्यपदार्थ.<br>२. आवडत्या अध्ययन कोपऱ्यात खेळण्याची संधी देणे.<br>३. मुलांच्या आवडी-निवडीविषयी संभाषण करणे. | रंग, ठोकळे, खेळणी, खाद्यपदार्थ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | कार्यकारण भाव | वर्तनाचे परिणाम | ४. एखाद्याच्या कृतीचा किंवा वर्तनाचा इतरांवर होणारा परिणाम स्पष्ट करतो. (उदा. कुत्र्याला दगड मारल्याने मुक्या प्राण्याला त्रास होतो, नळ बंद न केल्याने पाणी वाया जाते.) | १. चांगल्या-वाईट कृतींचा इतरांवर होणारा परिणाम स्पष्ट करणाऱ्या चित्रफिती दाखविणे.<br>२. चांगल्या-वाईट वर्तनाचा परिणाम दर्शविणाऱ्या गोष्टी सांगणे.<br>३. आपले चांगले व वाईट वर्तन आणि त्यांचा इतरांवर होणारा परिणाम, याविषयी मुलांशी चर्चा करणे.<br>(उदा. झाडांना पाणी दिल्याने ती वाढतात, रस्त्यावर कचरा टाकला तर रोगराई होऊन लोक आजारी पडतात.) | चित्रफिती, गोष्टी |

ध्येय : CG-7 : मुले निरीक्षण व वार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.
क्षमता : C-7.3 : दैनंदिन जीवनातील परिस्थितीमध्ये व अध्ययन करण्यासाठी सुयोग्य साधने व तंत्रज्ञान वापरतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | कला | साधनांचा व तंत्रज्ञानाचा वापर | १. चित्रकाम व रंगकाम करताना साधी साधने वापरण्यात निपुणता दर्शवितो. | १. विविध वस्तूंच्या आधारे रंगांची नावे सांगणे.<br>२. रंगांचे गाणे म्हणणे.<br>३. मेणाचे रंग वापरून आकृती रंगवणे.<br>४. कापलेल्या भेंडीचे, कांद्याचे व बटाट्याचे तुकडे, कागदाचे व कापसाचे बोळे वापरून रंगांचे ठसेकाम करणे. | विविध रंगांच्या वस्तू, गाणे, मेणाचे रंग, पाण्याचे रंग, भेंडी, कांदा, बटाटा, कागद, कापूस |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेतात.
क्षमता : C-8.1 : एकापेक्षा जास्त गुणधर्माच्या आधारे वस्तू, गटात आणि उपगटात वेगळ्या करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | तौलनिक संकल्पना | आकार, लांबी, वजन | १. आकार, लांबी, उंची व वजन यांवर आधारित वस्तू दोन गटात वेगवेगळ्या करतो. (लहान-मोठा, लांब-आखूड) | १. लहान-मोठा, लांब-आखूड, जड-हलका, उंच-ठेंगणा हे निकष सांगून मुलांना वस्तूंची विभागणी करण्यास सांगणे.<br>२. वस्तूंची विभागणी करताना तुलनादर्शक शब्दांचा योग्य वापर करणे. मुलांना तुलनादर्शक शब्द वापरण्याचा सराव देणे.<br>३. तुलनादर्शक शब्द वापरून मुलांना कृती करण्यास सांगणे.<br>उदा. १. जड पुस्तक माझ्याकडे दे. हलके पुस्तक तुझ्याजवळ ठेव.<br>२. लहान पट्टी पिशवीत ठेव. लांब पट्टी हातात धर. | विविध आकारांच्या वजनाच्या, लांबीच्या वस्तू |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेतात.
क्षमता : C-8.2 : आकार आणि संख्या यांच्या आधारे परिसरातील साधे आकृतिबंध ओळखतो आणि त्यांचा विस्तार करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | आकृतिबंध | आकार, वस्तू, चित्र, आकृतिबंध ओळखणे व पुनरावृत्ती करणे. | १. आकृतिबंध ओळखतो. आकार, पाने, फुले यांचा जोड्यांमधील पुनरावृत्तीनुसार आकृतिबंध तयार करतो. (पान-फूल, पान-फूल, ...., अ-ब, अ-ब, अ-ब, ...) | १. दिलेल्या आकृतिबंधाप्रमाणे ठोकळ्यांची रचना करणे.<br>२. दिलेल्या नमुन्याप्रमाणे दोऱ्यात मणी व फुले ओवणे.<br>३. परिसरातील आकृतिबंधांचे निरीक्षण करण्यास सांगणे. उदा. तोरण, घरातील फरशा इ. त्यांच्या नमुन्याविषयी चर्चा करणे.<br>४. पाने, फुले, वस्तू, आकार यांचे दिलेल्या पुनरावृत्तीनुसार आकृतिबंध तयार करणे. | ठोकळे, मणी, फुले, दोरा, तोरण, फरशा, पाने, वस्तू, आकार |
| बालवाटिका १ | आकृतिबंध | ध्वनींचे आकृतिबंध ओळखणे व पुनरावृत्ती करणे. | २. आवाजांमधील आकृतिबंध तयार करतो व पुनरावृत्ती करतो.<br>उदा. सा-रे-ग-म<br>सा-रे-ग-म<br>ध-म-ग<br>ध-म-ग | १. दोन ध्वनींच्या आकृतिबंधाच्या उच्चारणाचा आनंद घेणे. (उदा. छन्-छन्, घम्-घम्)<br>२. दोन आवाजांचा आकृतिबंध ऐकवून ती कृती करून घेणे. (उदा. टाळी-चुटकी, टाळी-चुटकी, दोन टाळ्या, दोन पावलांचा आवाज)<br>३. मुलांनी आवाजांचे स्वतःचे आकृतिबंध तयार करणे.<br>४. चमचा, वाटी, डबा, काठी यांच्या आवाजांचे आकृतिबंध तयार करणे. | चमचा, वाटी, डबा, काठी |
| बालवाटिका १ | आकृतिबंध | हालचाली | ३. हालचालींचे आकृतिबंध ओळखतो आणि पुनरावृत्ती करतो. (उदा. हात खाली-वर, हात खाली-वर, उडी मार- उभा रहा, उडी मार- उभा रहा.) | १. शिक्षिकेने केलेल्या शारीरिक हालचालींच्या कृतीचे अनुकरण करणे.<br>२. कमरेवर हात ठेवून डाव्या बाजूला वाकणे-उजव्या बाजूला वाकणे, या कृतीची पुनरावृत्ती करणे.<br>३. पायांच्या लयबद्ध हालचालींच्या आकृतिबंधाद्वारे नृत्य करणे.<br>४. मुलांना शारीरिक हालचालींचे नवे आकृतिबंध तयार करून नृत्य करण्याची संधी देणे. | मोबाईल, संगीताची धून, नृत्य |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेतात.
क्षमता : C-8.3 : १० आणि २०च्या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या (पुढे आणि मागे दोन्ही क्रमाने) मोजतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | संख्याबोध | संख्यानामे १ ते ५ | १. ५ पर्यंतची संख्यानामे संदर्भासह क्रमाने गातो/ सांगतो. | १. १ ते ५ पर्यंत संख्यांच्या ओळखीसाठी कृतियुक्त संख्यांची गाणी म्हणणे.<br>२. ऐकलेल्या गाण्यातील आशयाला संख्यानामे जोडून गाणे म्हणणे.<br>उदा. दोन आली माकडे हूप हूप हूप<br>तीन आली माकडे हूप हूप हूप<br>३. दिलेल्या संख्येच्या मागील व पुढील संख्यानामे सांगणे. | गाणी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | संख्याबोध | संख्यानामे १ ते ५ | २. ३ पर्यंत संख्यांची नावे आणि वस्तूमधील एकास एक संगती वापरून मोजणी करताना मोठ्यांचे अनुकरण करतो. | १. ३ पर्यंत वस्तूंचे/ चित्रांचे गट देणे. मुलांनी वस्तूंची/ चित्रांची एकास एक संगतीने संख्यानामे ओळखणे.<br>२. ३ पर्यंतची संख्यानामे ओळखण्यासाठी ३ पर्यंतच्या वस्तू ठेवून त्यांची एक एका संख्यानामाशी संगती लावणे. | वस्तू, चित्रे, खेळ |
| बालवाटिका १ | संख्याबोध | संख्यानामे १ ते ५ | ३. ३ पर्यंतच्या वस्तूंची मोजणी करतो आणि त्याला तीन पर्यंत म्हणण्याची समज विकसित करतो. (उदा. तीनपर्यंत मोजणे आणि त्याला तीन म्हणणे.) १°, २°°, ३°°° | १. १°, २°°, ३°°° अशा गटवार वस्तू दाखवून एक, दोन, तीन अशी मोजणी करणे व मुलांना करायला लावणे.<br>२. एक एकने वस्तू समूह वाढवून व कमी करून संख्यांची ओळख करून देणे.<br>३. कृतीतून/ खेळातून ३ पर्यंतचे वस्तूसमूह व संख्यानामे यांची सांगड घालून सराव घेणे. उदा. २ उड्या मारणे, ३ टाळ्या वाजविणे इत्यादी. | वस्तू, चित्रे |
| बालवाटिका १ | संख्याबोध | संख्यानामे १ ते ५ | ४. दिलेल्या वस्तूसमूहातून वस्तू किंवा खेळणी मोजतो आणि त्यातील पाचपर्यंतच्या वस्तू/ खेळणी काढून देतो. | १. मुलांना ५ पर्यंतच्या वस्तूंचा/ खेळण्यांचा समूह देऊन त्यातील वस्तू/ खेळणी मोजण्याची संधी देणे.<br>२. दिलेल्या सूचने प्रमाणे वस्तूसमूहातील वस्तू मुलांनी बाजूला काढणे. उदा. दोन पेन्सिली, तीन पुस्तके इत्यादी. | वस्तू, खेळणी |
| बालवाटिका १ | संख्याबोध | संख्यानामे १ ते ५ तुलना | ५. तीनपर्यंतच्या वस्तूंच्या दोन गटांची तुलना करतो. कोणत्या गटात कमी, जास्त किंवा समान वस्तू आहेत ते सांगतो. | १. ३ पर्यंतच्या वस्तूंचे गट दाखविणे. दोन गटातील वस्तूंच्या संख्यांची तुलना करणे. दोन गटातील वस्तूंच्या संख्येत काय फरक आहे हे ओळखण्यास सांगणे. उदा. एका गटात दुसऱ्या गटापेक्षा वस्तू कमी आहेत/ जास्त आहेत/ समान आहेत.<br>२. फरक ओळखण्यासाठी एकास एक संगतीने कृती करण्याची संधी देणे. | वस्तू |
| बालवाटिका १ | संख्याबोध | संख्यानामे १ ते ५ | ६. दोन किंवा तीन वस्तूंचा गट ओळखून एका दृष्टिक्षेपात लगेच संख्या सांगतो. | १. वेगवेगळे वस्तूसमूह/ चित्रे दोन/ तीनच्या गटात देणे. त्यांची संख्या एका दृष्टिक्षेपात सांगण्याची संधी देणे.<br>२. दोन/तीन याप्रमाणे वस्तू/ बोटे, चित्रे/ खुणा दाखवून मुलांना एका दृष्टिक्षेपात संख्या सांगण्याचा सराव घेणे. | वस्तू, चित्रे |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेतात.
क्षमता : C-8.4 : चढत्या आणि उतरत्या क्रमाने ९९ पर्यंतच्या संख्यांची मांडणी करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | संख्या आणि त्यांचा संबंध | क्रमसंबंध | १. परिचित घटना/ वस्तू क्रमाने मांडतो. (उदा. दैनंदिन दिनचर्या, कथा, आकार, २-३ आकार) | १. गोष्टीची चित्रकार्डे क्रमाने लावणे.<br>२. दिनचर्येतील ३-४ घटना योग्य क्रमाने सांगणे.<br>३. उंची, जाडी, लांबी यांच्या निकषानुसार दिलेले आकार चढत्या/ उतरत्या क्रमाने लावणे.<br>४. शिक्षिकेने गोष्ट सांगितल्यानंतर गोष्टीतील घटनांचा योग्य क्रम सांगणे व घटनाक्रमावर चर्चा करणे. | चित्रकार्डे, वस्तू, विविध आकार, गोष्ट |
| बालवाटिका १ | संख्या आणि त्यांचा संबंध | क्रमसंबंध | २. परिचित घटना/ वस्तू क्रमाने मांडतो. (उदा. दैनंदिन दिनचर्या, कथा, आकार, २-३ आकार) | १. गोष्टीची चित्रकार्डे क्रमाने लावणे.<br>२. दिनचर्येतील ३-४ घटना योग्य क्रमाने सांगणे.<br>३. उंची, जाडी, लांबी यांच्या निकषानुसार दिलेले आकार चढत्या/ उतरत्या क्रमाने लावणे.<br>४. शिक्षिकेने गोष्ट सांगितल्यानंतर गोष्टीतील घटनांचा योग्य क्रम सांगणे व घटनाक्रमावर चर्चा करणे. | चित्रकार्डे, वस्तू, विविध आकार, गोष्ट |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेतात.
क्षमता : C-8.5 : स्थानिक किंमतीचा वापर करून ९९ पर्यंतच्या संख्या दर्शविण्यासाठी संख्याचिन्हांचा वापर करतो आणि संख्या ओळखतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | संख्या आणि त्यांचा संबंध | संख्येची तुलना | १. ३ पर्यंत दोन संख्यांची (तोंडी) तुलना करतो व जास्त-कमी असा शब्दसंग्रह वापरतो. | १. ३ पर्यंतच्या वस्तूंचे दोन गट दाखवून त्या गटातील वस्तूंची संख्या ओळखणे. दोघांची तुलना करणे. (उदा. २ ठोकळे, ३ चेंडू ठोकळ्यांपेक्षा जास्त)<br>२. वस्तू समूह दाखवून कमी-जास्त हे शब्दप्रयोग वापरण्याची संधी देणे.<br>२. संख्या आणि कमी-अधिक हे शब्दप्रयोग वापरून गोष्ट सांगणे. उदा. २ ठोकळे, ३ चेंडू, चेंडू ठोकळ्यापेक्षा जास्त | वस्तू , गोष्ट |
| बालवाटिका १ | संख्या आणि त्यांचा संबंध | संख्येची तुलना | २. ३ पर्यंत दोन संख्यांची (तोंडी) तुलना करतो व जास्त-कमी असा शब्दसंग्रह वापरतो. | १. ३ पर्यंतच्या वस्तूंचे दोन गट दाखवून त्या गटातील वस्तूंची संख्या ओळखणे. दोघांची तुलना करणे. (उदा. २ ठोकळे, ३ चेंडू ठोकळ्यांपेक्षा जास्त.)<br>२. वस्तू समूह दाखवून कमी-जास्त हे शब्दप्रयोग वापरण्याची संधी देणे.<br>२. संख्या आणि कमी-अधिक हे शब्दप्रयोग वापरून गोष्ट सांगणे. उदा. २ ठोकळे, ३ चेंडू, चेंडू ठोकळ्यापेक्षा जास्त | वस्तू , गोष्ट |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेतात.
क्षमता : C-8.6 : संख्यांना जोडणे व विभागणे या लवचिक कार्यनितीचा वापर करून दोन अंकी संख्यांची बेरीज आणि वजाबाकी अचूकपणे करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | मूलभूत गणिती क्रिया | बेरीज वजाबाकी | १. तोंडी उत्तर देण्याऐवजी, लहान गट करून त्यातील ३ पर्यंतच्या वस्तू बाजूला काढतो किंवा मिळवतो. (by grouping or ungrouping) | १. वस्तूंच्या गटात ५ किंवा ६ वस्तू देणे. त्यातून १ वस्तू, २ वस्तू, ३ वस्तू बाजूला काढण्यास सांगणे (ungrouping)<br>२. १ वस्तू ठेवणे, २ वस्तू ठेवणे, ३ वस्तू ठेवून गट तयार करणे. (grouping) | वस्तू |
| बालवाटिका १ | मूलभूत गणिती क्रिया | बेरीज वजाबाकी | २. ३ पर्यंतच्या वस्तू गटात एकत्र करून, विभागून त्यांची संख्या तोंडी सांगतो. | १. ३ पर्यंतच्या वस्तूंची देवाण-घेवाण करायला लावून बेरीज-वजाबाकीचा संबोध विकसित करणे.<br>उदा. जगनकडे १ आंबा आहे. छगनकडे २ आंबे आहेत. दोघांकडे मिळून किती आंबे आहेत?<br>२. दिलेल्या वस्तू समूहातून १/२/३ वस्तूंचा गट तयार करणे.<br>३. ३ पर्यंतच्या वस्तूसमूहातून काही वस्तू कमी करून तयार होणाऱ्या गटातील वस्तूंची संख्या सांगणे.<br>४. कृतियुक्त खेळ, गाणी व गोष्टीतून एकत्र करणे व विभागणे या संकल्पना स्पष्ट करणे.<br>५. एकत्र करणे, तोडणे, मिसळणे, काढून घेणे, वाढविणे, सुटे करणे हे शब्दप्रयोग वापरण्याची संधी देणे. | वस्तू, चित्रे, फळे |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेतात.
क्षमता : C-8.7 : गुणाकार म्हणजे पुन्हा-पुन्हा बेरीज आणि भागाकार म्हणजे समान वाटणी हे समजतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | मूलभूत गणिती क्रिया | भागाकाराची पूर्वतयारी | १. दिलेल्या वस्तूंचे वाटप करतो. | १. मुलांना ३ पर्यंतच्या वस्तू इतरांना वाटण्यास सांगणे.<br>२. वस्तूंचे समान वाटप करताना वस्तू कमी पडल्या किंवा जास्त झाल्या तर काय करावे यावर चर्चा करणे.<br>३. पातळ द्रवपदार्थ किंवा फळासारखी वस्तू वाटायची असेल तर काय करावे, यावर चर्चा करणे. | वस्तू, सरबत, फळे |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेतात.
क्षमता : C-8.8 : मूलभूत भौमितिक आकार ओळखतो, ते तयार करतो, त्यांचे वर्गीकरण करतो, समजून घेतो आणि समजावून सांगतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | आकार आणि अवकाशीय समज | विविध आकारांची ओळख | १. आकार, माप किंवा रंग यांपैकी एक वैशिष्ट्य वापरून जोड्या लावतो. | १. विविध भौमितिक आकारांचा परिचय करून देणे.<br>२. वस्तू आणि त्यांचे आकार यांविषयाचे गाणे म्हणणे.<br>३. विविध रंगांच्या वस्तू आणि रंगकार्डे यांच्या जोड्या लावणे.<br>४. समान रंगांच्या वस्तूंत/ चित्रांत एक भिन्न रंगांची वस्तू/ चित्र ठेवून पाहुणा ओळखा हा खेळ खेळणे.<br>५. प्राणी/ पक्षी आणि त्यांच्या सावल्या यांच्या जोड्या लावणे.<br>६. भेंडी, बटाटा, वांगे, ड्रायफ्रूट यांची कापे रंगात बुडवून ठसेकाम करणे.<br>७. △, ○, □ या भौमितिक आकारांची चित्रकार्डे मुलांकडे देणे. शिट्टी मारताच समान आकृती असलेल्यांनी आपला गट तयार करण्याचा खेळ खेळणे.<br>८. भौमितिक आकारांवर बिया, खडे, मणी लावणे. | भौमितिक आकारांची चित्रकार्डे, विविध आकारांच्या वस्तू, भेंडी, बटाटा, वांगे, ड्रायफ्रूट, बिया, मणी, खडे, गाणी, भौमितिक आकारांच्या आकृत्या |
| बालवाटिका १ | आकार आणि अवकाशीय समज | आकारांचे वर्गीकरण | २. आकार, रंग आणि माप (आकारमान) यांसारख्या एका घटकाद्वारे तुलना आणि वर्गीकरण करतो. | १. समान भौमितिक आकाराला जुळणाऱ्या वस्तूंचे वर्गीकरण करून त्यांना वेगवेगळ्या पात्रात ठेवणे.<br>२. △/ ○/ □ यांसारख्या आकारातून त्यांच्याशी जुळणाऱ्या वस्तूंची आकृती तयार करणे. उदा. सूर्य, फुलपाखरू, घर इत्यादी. | वस्तू, पात्रे, कागद |
| बालवाटिका १ | आकार आणि अवकाशीय समज | आकारांचे वर्गीकरण | ३. साध्या सूचनांचे पालन करतो आणि वस्तू, आकार, रंग, माप यानुसार, वस्तू जागेवर ठेवतो. उदा. लाल फुगा इथे आण आणि गोल चेंडू टेबलावर ठेव. | १. सूचना देऊन वर्गीकरणाची कृती करायला लावणे.<br>उदा. पिवळा रुमाल पिशवीत ठेव, चौकोनी कार्ड टेबलावर ठेव. | रुमाल, कार्ड, पिशवी, टेबल |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेतात.
क्षमता : C-8.9 : लगतच्या परिसरातील वस्तूंची लांबी, वजन आणि आकारमानानुसार साधी मोजमापे करण्यासाठी साधन व एकक निवडतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | मापन | लांबीचे मापन | १. कविता आणि कथांद्वारे लांबी व्यक्त करण्यासाठी शब्दसंग्रह वापरतो. (उदा. लांबी, रुंदी, उंची, अंतर) | १. वर्गखोली, बाग, शाळेभोवतालच्या परिसरातील वस्तू, खेळणी, झाडे, पाने, फुले दाखवून त्यांची लांबी, रुंदी, उंची व अंतरासाठी विविध शब्दप्रयोग शिक्षिकेने वापरणे व मुलांना वापरण्याची संधी देणे.<br>उदा. १. वर्गातील कपाट उंच आहे.<br>२. समोरचा रस्ता खूप रुंद आहे.<br>३. ही काठी सर्वांत लांब आहे.<br>२. लांबी, रुंदी, उंची, अंतर हे शब्द असलेल्या कथा सांगणे. कृतियुक्त गाणी म्हणणे. | बाग, वस्तू, खेळणी, झाडे, पाने, फुले, कपाट, रस्ता, काठी, कथा, गाणी |
| बालवाटिका १ | मापन | वजनाचे मापन | २. कविता आणि कथांद्वारे वजन संकल्पना व्यक्त करण्यासाठी शब्दसंग्रह वापरतो. | १. बागेत 'सी-सॉ'वर मुलांना बसवून कोण जड, कोण हलका हे सांगणे.<br>२. टेनिस बॉल, कॉटनबॉल, खडू, पान, कापूस इत्यादी वस्तू हातात देऊन मुलांना जड, हलका हे शब्द वापरण्याची संधी देणे.<br>३. कविता व गोष्टीतून जड, हलका हे शब्द वापरून वजनाची संकल्पना स्पष्ट करणे. | सी-सॉ, टेनिस बॉल, कॉटनबॉल, खडू, पान, कापूस, कविता, गोष्टी |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेतात.
क्षमता : C-8.10 : मिनिटे, तास, दिवस, आठवडे आणि महिने, वेळेची मोजमापे या एककामध्ये कालमापन करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | कालमापन | आज, उद्या, काल | १. दैनंदिन जीवनात आज, उद्या आणि काल यांसारख्या शब्दांचा वापर करतो. | १. दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटना व प्रसंगांच्या संदर्भात काल, आज, उद्या हे शब्द वापरून प्रश्न विचारणे. मुलांना काल, आज, उद्या या शब्दांचा वापर करून उत्तर देण्याची संधी देणे.<br>२. काल आज आणि उद्या हे शब्दप्रयोग असलेली कविता म्हणणे.<br>३. प्रदर्शनी फलकावर तारीख, वार, महिना, हवामानाची माहिती लिहिणे यांसंदर्भात मुलांना काल, आज आणि उद्या या शब्दांचा वापर करून प्रश्न विचारणे. | गोष्ट, कविता, प्रदर्शनी फलक |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेतात.
क्षमता : C-8.11 : १०० रुपयांपर्यंतचे साधे व्यवहार करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | आर्थिक संकल्पना | नाणी व नोटांची ओळख | १. कविता आणि गोष्टींच्या आधारे पैशाशी संबंधित शब्दसंपत्तीचा वापर करतो. | १. नाण्यावर पातळ कागद ठेवून त्यावर मेणाचा रंग घासून छाप तयार करणे.<br>२. रुपये, पैसे, नाणी यांचा संदर्भ असलेल्या गोष्टी व गाणी ऐकवणे. | नाणी, कागद, मेणाचे रंग, गोष्टी, गाणी |

ध्येय : CG-8 : मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेतात.
क्षमता : C-8.12 : राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संकल्पनांचे आकलन होण्यासाठी आणि संकल्पना व्यक्त करण्यासाठी सुयोग्य व पुरेशी शब्दसंपत्ती विकसित करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | गणितीय संप्रेषण | आकारनामे गुणधर्म, नियमित व अनियमित भौमितिक आकार व गुणधर्म | १. आकारांची नावे व त्यांचे काही गुणधर्म सांगतो. | १. नियमित व अनियमित आकाराच्या वस्तू प्रत्यक्ष दाखवून, नियमित व अनियमित भौमितिक आकार संकल्पना स्पष्ट करून सांगणे.<br>२. मुलांनी आकारांची नावे ओळखणे व त्याचे गुणधर्म सांगणे.<br>३. 'आकार शोध' (शेप हंट) खेळ खेळणे.<br>४. विविध आकारांच्या आकृती मेणाच्या रंगांनी रंगविणे. | वस्तू, आकृती, कागद, मेणाचे रंग |

ध्येय : CG-8 :.मुलांची गणितीय समज विकसित होते आणि ती विविध राशी, आकार, मापे यांचा वापर करत जग समजून घेतात.
क्षमता : C-8.13 : राशी, आकार, अवकाश आणि मोजमापे या संदर्भात सोपी गणिते सोडवतो व तयारही करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | गणितीय कोडी | भौमितिक आकार (वर्तुळ, त्रिकोण, आणि चौकोन) | १. भौमितिक व इतर आकारांवर आधारित सोपी कोडी सोडवतो. | १. विविध आकारांच्या खोदपट्टीत त्या आकाराच्या लाकडी वस्तू बसविणे.<br>२. ठोकळ्यांच्या विविध रचना करणे.<br>३. मनोरंजक भाषेत विचारलेली कोडी सोडवणे व उत्तर सांगणे.<br>उदा. ३ बाजू, ३ कोन दिसतो किती छान! छान! सांगा पाहू मी कोण? मी कोण?<br>उत्तर : त्रिकोण.<br>४. आकार सांगताच त्या आकाराच्या वस्तूचे नाव सांगण्याचा खेळ घेणे.<br>५. विविध आकारांच्या वस्तू मेणाच्या रंगांनी रंगविणे. | खोदपट्टी, लाकडी वस्तू, ठोकळे, कोडी, खेळ, कागद, रंग |

**विकासक्षेत्र : भाषा आणि साक्षरता विकास (प्राणमय आणि विज्ञानमय कोश विकास)**

ध्येय : CG-9 : मुले दोन भाषांमध्ये संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.

क्षमता : C-9.1 : साधी गाणी, बडबडगीते आणि कविता ऐकतो आणि आवड व्यक्त करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | श्रवण | बडबडगीते, गाणी, कविता | १. विविध प्रकारची गाणी आणि कविता ऐकतो. | १. छोटी बडबडगीते, गाणी, कविता ऐकणे.<br>२. हावभाव आणि आवाजातील चढउताराचा वापर करून साधी-सोपी बडबडगीते व गाणी मुलांना ऐकवणे.<br>३. हातबाहुल्या, खेळणी वापरून गाणी ऐकवणे व मुलांच्या मनात गाणी ऐकण्याची आवड निर्माण करणे.<br>४. ध्वनिफितीवरील गाणी ऐकताना मुलांना मुक्त हालचाली करून आनंद घेण्याची संधी देणे. | बडबडगीते, गाणी, कविता, हातबाहुल्या, खेळणी, ध्वनिफित |
| बालवाटिका १ | श्रवण, मौखिक, भाषा, शब्दसंपत्ती | बडबडगीते, गाणी, कविता | २. साधे गाणे, बडबडगीत ऐकून म्हणतो. | १. ऐकलेली छोटी बडबडगीते, गाणी, कविता हावभाव आणि आवाजातील चढउतारासह म्हणणे.<br>२. बडबडगीते म्हणताना हातबाहुल्या आणि खेळण्यांचा उपयोग करणे.<br>३. खंजिरी, ढोलक, टाळ्या यांच्या साथीसह शिक्षिकेने गाणी ऐकवणे व मुलांना गाणी म्हणण्याची संधी देणे.<br>४. गाण्यांच्या ध्वनिफिती ऐकवणे. | बडबडगीते, गाणी, हातबाहुल्या, खेळणी, खंजिरी, ढोलक |

ध्येय : CG-9 : मुले दोन भाषांमध्ये संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.

क्षमता : C-9.2 : स्वतःहून साधी गाणी आणि कविता तयार करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | श्रवण, भाषण, सर्जन | गाणी, कविता, ध्वनींची जाण, आस्वाद | १. परिचित गाणी आणि कवितांचा आनंद घेतो. | १. परिसरातील गाणी तालासुरात ऐकण्याची संधी देणे.<br>२. ध्वनिफित व चित्रफितीद्वारे गाणी ऐकण्याची व आनंद घेण्याची संधी देणे.<br>३. पशू, पक्षी, भाज्या, फळे, वाहने यांसारख्या विषयांवरील मुलांच्या भावविश्वातील गाणी पुन्हा-पुन्हा ऐकण्याची संधी देणे.<br>४. मुले बडबडगीते आणि परिचित गाणी म्हणताना त्यांना त्यात स्वतःचे ध्वनी, अक्षरे, शब्द जोडण्याची संधी देणे.<br>५. शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात, स्थानिक सण-उत्सव प्रसंगी मुलांना गाणी सादर करण्याची संधी देणे. | गाणी, ध्वनिफित, चित्रफित, सांस्कृतिक कार्यक्रम, उत्सव |

ध्येय : CG-9 : मुले दोन भाषांमध्ये संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.
क्षमता : C-9.3 : अस्खलितपणे आणि अर्थपूर्ण संभाषण करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | श्रवण संभाषण | गाणी, गोष्टी, गप्पा | १. लक्षपूर्वक ऐकतो आणि आजुबाजूच्या परिचित लोकांशी छोटे संभाषण करतो. | १. गाणी, गोष्टी व गप्पांचे उपक्रम घेणे.<br>२. गाणी, गोष्टी व गप्पांमध्ये मुलांना व्यक्त होण्याची भरपूर संधी देणे.<br>३. चित्रवाचन, चित्रवर्णन व चित्रगप्पांचे आयोजन करणे.<br>४. दैनंदिन व्यवहारातील संभाषणाच्या चित्रफिती पाहणे.<br>५. बाहुलीघर, स्वयंपाकघर, खेळणीघर यांसारख्या अध्ययन कोपऱ्यात मुलांना खेळ खेळताना भरपूर बोलण्याची संधी देणे.<br>६. बोलक्या बाहुल्यांचा दैनंदिन जीवनावर आधारित संवाद ऐकणे. | गाणी, गोष्टी, गप्पा, चित्रे, चित्रपट्ट्या, चित्रफिती, बाहुलीघर, खेळणीघर, स्वयंपाकघर, बोलक्या बाहुल्या |
| बालवाटिका १ | संभाषण | शब्दसंग्रह विकास, अभिव्यक्ती | २. लहान अर्थपूर्ण वाक्यांद्वारे त्याच्या गरजा आणि भावना व्यक्त करतो. | १. विविध प्रसंगांची निर्मिती करून प्रत्येक बालकाला त्याच्या भावना व विचार व्यक्त करण्याची संधी देणे.<br>२. मुलांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित त्यांच्या गरजांची यादी करून त्यासंदर्भातील शब्दयोजना वारंवार मुलांना ऐकवणे.<br>३. गप्पागोष्टीच्या माध्यमातून मुलांना त्यांचे आवडते खाण्याचे पदार्थ, खेळणी यांविषयी बोलण्याची संधी देणे.<br>४. मुलांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित संभाषणाच्या चित्रफिती दाखविणे.<br>५. बोलक्या बाहुल्यांचे संभाषण ऐकविणे. | शब्दयोजना, चित्रफिती, बोलक्या बाहुल्या |

ध्येय : CG-9 : मुले दोन भाषांमध्ये संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.
क्षमता : C-9.4 : क्लिष्ट कार्य पूर्ण करण्यासाठी मौखिक सूचना समजून घेतो व इतरांना तशाच स्पष्ट तोंडी सूचना देतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | संभाषण | संवाद, सूचना | १. छोट्या स्वरुपाच्या सूचना ऐकतो व त्याचे अनुपालन करतो. (उदा. ठोकळे इकडे आण, हात स्वच्छ धू. इ.) | १. सूचना व कृतीचा खेळ खेळणे.<br>उदा. सैनिक म्हणतो टाळी वाजवा. (टाळी वाजवणे)<br>सैनिक म्हणतो उडी मारा. (उडी मारणे)<br>२. सूचनांचे पालन करणाऱ्या मुलांसाठी टाळ्या वाजवून प्रेरणा देणे.<br>३. कमीत कमी शब्दांच्या सूचना व त्यांचे अनुपालन यांचा सराव करून घेणे.<br>४. सूचना व त्यांच्या अनुपालनाविषयी चित्रफित दाखविणे. | खेळ, चित्रफित |

ध्येय : CG-9 : मुले दोन भाषांमध्ये संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.
क्षमता : C-9.5 : कथन केलेल्या/ वाचलेल्या गोष्टी समजून घेतो आणि त्यातील पात्रे, गोष्टींची मध्यवर्ती कल्पना आणि लेखकाला काय सांगायचे आहे हे लक्षात घेतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | श्रवण | गोष्टी | १. अल्प कालावधीसाठी छोट्या स्वरुपाच्या गोष्टी लक्षपूर्वक ऐकतो. (५ ते ७ मिनिटे) | १. मुलांच्या भावविश्वाशी संबंधित छोट्या गोष्टी सांगणे.<br>२. गोष्ट सांगताना हावभाव, आवाजातील चढउतार, बोलक्या बाहुल्या, खेळणी, चित्रे यांचा योग्य वापर करून मुलांना गोष्टींचा आनंद देणे.<br>३. मुलांनी बोलक्या बाहुल्या, चित्रे, खेळणी यांचा वापर करून गोष्टीतील आवडलेले संवाद म्हणण्याचा प्रयत्न करणे. | गोष्टी, बोलक्या बाहुल्या, खेळणी, चित्रे |

ध्येय : CG-9 : मुले दोन भाषांमध्ये संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.
क्षमता : C-9.6 : स्पष्ट कथानकासह लघुकथा आणि पात्रे यांचे कथन करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | नाही | नाही | या वयोगटासाठी अध्ययन निष्पत्ती नाही. | नाही | नाही |

ध्येय : CG-9 : मुले दोन भाषांमध्ये संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.
क्षमता : C-9.7 : दैनंदिन संवाद परिणामकारकरित्या साधण्यासाठी पुरेसे शब्द आत्मसात करतो व आत्मसात केलेल्या शब्दसंग्रहाचा वापर करून नवीन शब्दांचा अर्थ लावतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | संभाषण | शब्दसंग्रह चित्रवाचन | १. दैनंदिन परिचयातील काही वस्तू आणि अनुभव यांसाठी योग्य शब्दांचा वापर करतो. (उदा. स्वतः चे व मित्राचे नाव, सामान्य वस्तू, चित्रे, गोड-आंबट, गोल-मोठा इ.ची नावे सांगतो.) | १. चित्रांचे निरीक्षण करून त्यात दिसणाऱ्या वस्तू, व्यक्ती यांची नावे सांगणे. चित्रातील कृतीविषयी मुलांनी बोलणे.<br>२. चित्रे, चित्रफिती वापरून तसेच प्रत्यक्ष दाखवून प्राणी, पक्षी, वस्तू, व्यक्ती, पदार्थ यांचा परिचय करून देणे.<br>२. गप्पागोष्टी करताना मुलाने आपले नाव व आपल्या मित्राचे नाव सांगणे.<br>४. विविध अध्ययन प्रसंगांची निर्मिती करून वस्तू, व्यक्ती, रंग, आकार,नाती, चव यांविषयीचा शब्दसंग्रह वाढविणे. | चित्रे, चित्रफिती, वस्तू, पदार्थ |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.1 : शब्दध्वनीची जाणीव होऊन शब्दध्वनी/ अक्षरे शब्दात गुंफतो आणि शब्दांपासून शब्दध्वनी/ अक्षरे वेगळी करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | संभाषण | बडबडगीते | १. बडबडगीते म्हणतो | १. हावभाव व आवाजातील चढउताराचा वापर करून तालासुरात बडबडगीते म्हणणे.<br>२. शब्दांची पुनरावृत्ती असलेली व उच्चाराची गंमत असलेली बडबडगीते म्हणणे.<br>३. वर्गात, परिपाठात, सांस्कृतिक कार्यक्रमात परिचित बडबडगीते सादर करण्याची, मुलांना संधी देणे.<br>४. संगीताची साथ व शब्दांच्या उच्चाराची गंमत असलेल्या बडबडगीतांची ध्वनिफित ऐकवणे. | बडबडगीते, ध्वनिफित |
| बालवाटिका १ | संभाषण | शब्दांचे उच्चार, ध्वनीची जाणीव, ध्वनी-चिन्ह, संबंध | २. अक्षरध्वनीची नक्कल आणि मिर्मिती करतो. | १. मुलांना परिचित असलेल्या वस्तूचे चित्र आणि त्यासोबत असलेला शब्द दाखविणे. शिक्षिकेने नाव वाचणे व मुलाकडून म्हणवून घेणे.<br>२. सराव करून चित्रांच्या शब्दांचा योग्य उच्चार करण्याची संधी देणे.<br>३. वैयक्तिकरित्या, गटात व समूहात अक्षरे म्हणण्यास सांगणे.<br>४. 'र', 'ल', 'श', 'स' या सारख्या अक्षरांचा योग्य उच्चार ऐकण्याची व स्वतः करण्याची संधी देणे.<br>५. अक्षरांच्या उच्चारांची गंमत असणारी बडबडगीते, गाणी म्हणणे. गाणी म्हणताना मुलांना स्वतःची अक्षरे, शब्द, ध्वनी मिसळण्याची संधी देणे. | चित्रे, शब्दयुक्त चित्रे, बडबडगीते, गाणी |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.2 : पुस्तकाची मूलभूत रचना/ स्वरुप, मुद्रित अक्षरांची कल्पना ओळखतो, मुद्रित झालेल्या मजकुराची दिशा समजून घेतो व पुस्तकातील प्राथमिक विरामचिन्हे ओळखतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | वाचनपूर्व तयारी | शब्द ओळख, चिन्हे, प्रतीक | १. सर्वसामान्य चिन्हे, प्रतीके व मुद्रा (लोगो) ओळखतो. (उदा. बिस्किट किंवा साबणाचे आवरण किंवा रंगावरून विशिष्ट साबण ओळखतो.) | १. दैनंदिन वापरातील वस्तू व त्यांची आवरणे मुलांना दाखवणे.<br>२. घरातील विविध वस्तूंची वेष्टणे (रॅपर) वर्गात आणण्यास सांगणे.<br>३. मुलांनी आणलेली वेष्टणे दाखवून त्यांविषयी गप्पागोष्टी करणे.<br>४. वेष्टणांवर आधारित सोपे प्रश्न विचारणे. वेष्टणांवरील चित्रे, चिन्हे, प्रतीके, मुद्रा यांची मुलांना माहिती देणे.<br>५. मुलांना वेष्टणांचा संग्रह करण्यास सांगणे.<br>६. मुलांना परिचित असलेल्या शाळेच्या आवारातील फलकांवरील सूचना, विविध चिन्हे, प्रतीके यांबद्दल संभाषण करणे. | विविध वस्तूंची वेष्टणे, फलक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | वाचन | चित्रवाचन, पुस्तक हाताळणे | २. मुद्रित मजकूर आणि चित्रांमध्ये फरक करतो. | १. खूप मोठी आणि जास्त चित्रे असलेली पुस्तके मुलांना हाताळण्यासाठी देणे.<br>२. पुस्तक हातात कसे धरतात, पाने कशी उलटतात याचे प्रात्यक्षिक शिक्षिकेने करून दाखविणे.<br>३. पुस्तकाचे टप्प्याटप्प्याने सहभागी वाचन करून घेणे.<br>४. प्रत्येक मूल सहभागी वाचनात सहभागी होत आहे याकडे लक्ष देणे.<br>५. छोटे-छोटे प्रश्न विचारून मुलांची जिज्ञासा जागृत करणे.<br>६. मुद्रित मजकूर आणि चित्रे यांतील फरक ओळखण्यास प्रोत्साहन देणे. | चित्रपुस्तके |
| बालवाटिका १ | वाचन | चित्रवाचन अनुवाचन | ३. चित्रमय गोष्टींच्या परिचित पुस्तकांचे वाचन करत आहे, असे दाखवतो. | १. चित्रमय गोष्टींची परिचित पुस्तके मुलांना पहावयास देणे.<br>२. चित्रे दाखवून त्यावर साधेसोपे प्रश्न विचारणे.<br>३. चित्रांचे वर्णन करण्यास प्रोत्साहन देणे.<br>४. चित्रमय गोष्टींच्या पुस्तकातील परिचित गोष्टीचे शिक्षिकेने वाचन करणे व मुलांकडून वाचन करून घेणे. मुलांच्या वाचनाचा स्वीकार करणे. | चित्रमय पुस्तके |

ध्येय : CG-10 : ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.3 : भाषा एक (L1)च्या लिपीतील सर्व अक्षरे व अवयव ओळखतो आणि या ज्ञानाचा उपयोग शब्द वाचन-लेखनासाठी करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | लिपी परिचय | ध्वनिचिन्ह ध्वनीची जाण | १. शब्द हे अक्षरांपासून तयार होतात हे माहिती करून घेतो. | १. परिचित असलेल्या शब्दांची अक्षरे आणि त्यांचे उच्चार (ध्वनी) यांची ओळख करून देणे. शब्दांतील प्रत्येक अक्षर वेगळे काढून त्याचे स्थान व त्याचा उच्चार कसा होतो हे दाखविणे व उच्चार करून घेणे.<br>२. शब्दाचा उच्चार आणि त्यानंतर त्यातील अक्षरा इतक्या टाळ्या वाजवण्याचा खेळ घेणे. उदा. कप- दोन टाळ्या, कमळ- तीन टाळ्या.<br>३. समान अक्षरकार्डे जुळविणे.<br>४. चित्र-चित्रासोबत शब्द-केवळ शब्द या सूत्रानुसार शब्दांची ओळख करून देणे.<br>५. शब्दभेंड्यांचा खेळ घेणे.<br>६. दिलेल्या अक्षरांतून शब्द बनविणे.<br>७. लेखनपूर्व तयारी करणे. हाताच्या स्नायूंचा विकास होण्यासाठी कागद फाडणे, धान्य निवडणे, खडूने गिरगिटवणे यांसारख्या कृती घेणे. | अक्षरकार्डे, चित्रे, शब्दकार्डे, कागद, खडू, धान्य |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.4 : भाषा एक (L1) मधील कथा आणि परिच्छेद योग्य ठिकाणी विराम घेऊन आणि आवाजातील चढउतारासहित अचूकपणे व ओघवतेपणाने वाचतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | नाही | नाही | १. या वयोगटासाठी अध्ययन निष्पत्ती नाही. | नाही | नाही |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.5 : स्वतःहून पात्रांची ओळख, कथाबीज व लेखकाला जे सांगायचे आहे ते समजून कथा वाचतो व त्याचा अर्थ समजून घेतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | श्रवण आकलन | गाणी, गोष्टी, नाट्यछटा, नाटिका | १. प्रकटवाचन ऐकतो आणि शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देतो. | १. विविध प्राणी, पक्षी, वस्तू इत्यादींवर आधारित योग्य हावभाव व आवाजातील चढउतारासहित गाणी, गोष्टी, नाट्यछटा, नाटिका मुलांना वाचून दाखविणे. त्यावर आधारित प्रश्न विचारणे.<br>२. वाचलेली गोष्ट, नाटिका, नाट्यछटा यांवर गप्पागोष्टी करणे. | गाणी, गोष्टी, नाटिका, नाट्यछटा |
| बालवाटिका १ | वाचन | चित्रवाचन शब्दसंग्रह | २. चित्रपुस्तके वाचतो आणि कृती व वस्तू ओळखतो. | १. नादमय शब्द असलेली, शब्दांच्या पुनरावृत्तीतून रंजन करणारी, रंगीत, भरपूर चित्रे असलेली, कमी मजकूर असलेली मोठ्या आकाराची गोष्टीची पुस्तके मुलांना वाचण्यासाठी देणे.<br>२. चित्रांची नावे, कृती, वस्तू, प्राणी व पक्षी ओळखण्यासाठी मुलांना प्रोत्साहन देणे.<br>३. गोष्टींतील पात्रांविषयी प्रश्न विचारून मुलांना बोलते करणे. | चित्रपुस्तके |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.6 : कवितेतील कल्पना व शब्दयोजना यांचे रसग्रहण करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | नाही | नाही | या वयोगटासाठी अध्ययन निष्पत्ती नाही. | नाही | नाही |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.7 : छोट्या बातम्या, सूचना, पाककृती आणि प्रकाशित साहित्य वाचतो आणि आतील अर्थाचे आकलन करून घेतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | नाही | नाही | या वयोगटासाठी अध्ययन निष्पत्ती नाही. | नाही | नाही |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.8 : स्वतःला समजलेल्या गोष्टी सांगण्यासाठी व स्वतःचे अनुभव व्यक्त करण्यासाठी लेखन करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | लेखन | लेखन साहित्य ओळख, वापर ध्वनी व चिन्हसंबंध | १. विविध लेखन सामग्रीचा वापर करतो. (खडूचा तुकडा, पेन्सिल, रंगीत खडू, चित्रकलेत वापरायचे ब्रश इ.) | १. मुलांना खडूचे तुकडे, पेन्सिल, मेणाचे रंग, चित्रकलेत वापरायचे ब्रश, कागद इत्यादी लेखनसाहित्याची प्रात्यक्षिकासह ओळख करून देणे.<br>२. लेखनसाहित्य मुलांना प्रत्यक्ष हाताळण्यास देणे.<br>३. कागदावर, फळ्यावर गिरगिटण्याची संधी देणे.<br>४. दिलेल्या आकृतीत रंग भरणे, मुक्तचित्र काढणे यांसारख्या विविध कृतीतून लेखन सामग्रीचा वापर करणे. | खडूचे तुकडे, पेन्सिल, मेणाचे रंग, कागद, फळा, ब्रश, रंग |
| बालवाटिका १ | लेखन | लेखनपूर्व तयारी गिरगिटवणे | २. उभ्या-आडव्या रेषा, टिंब, अर्धगोल, गोल इ. चिन्हे कागदावर उमटवतो म्हणजेच गिरगिटवतो व आपण काय लिहिले आहे ते एक-दोन शब्दांत सांगतो. | १. चित्र आणि खेळाच्या स्वरुपात उभ्या रेषा, आडव्या रेषा, टिंब, अर्धगोल, गोल इत्यादी आकृतींचा परिचय करून देणे. (उदा. फळ्यावरील आकृती पाहून हवेत बोटाने तशा आकृती काढणे)<br>२. उभ्या रेषा, आडव्या रेषा व इतर आकारांची बडबडगीतांतून व गाण्यातून ओळख करून देणे.<br>३. उभ्या रेषा, आडव्या रेषा व इतर आकारांच्या आकृतीत चिंचोळे, खडे, पाने, फुले, मणी यांची रचना करणे.<br>४. मुलांना उभ्या रेषा, आडव्या रेषा, टिंब, अर्धगोल, गोल इत्यादी चिन्हे कागदावर गिरगिटवण्याची संधी देणे. त्यांनी काढलेल्या आकारांविषयी गप्पागोष्टी करून त्यांनी काय लिहिले आहे हे जाणून घेणे. | गाणी, चिंचोके, खडे, मणी, पाने, फुले, कागद, पेन्सिल |
| बालवाटिका १ | सर्जनशी-लता | प्रतिभा, कला, अभिव्यक्ती | ३. चित्रे रेखाटतो, रंगवतो आणि रेखाटनाचा हेतू तोंडी सांगतो. | १. मुलांनी आपल्या आवडीची चित्रे काढणे व रंगविणे.<br>२. काढलेल्या चित्रांविषयी संभाषण करून मुलांचे विचार, कल्पना, भावना जाणून घेणे. | कागद, पेन्सिल, मेणाचे रंग |

ध्येय : CG-10 : मुले भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.
क्षमता : C-10.9 : बालकांसाठी असलेली विविध पुस्तके वाचण्यात रुची दर्शवतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | श्रवण | वाचनपूर्व तयारी, रसग्रहण | १. वाचून दाखवलेल्या कविता आणि गोष्टी यांच्यामध्ये रुची दर्शवतो. | १. मुलांना आकर्षक चित्रे दाखवून त्यावर आधारित बडबडगीते, कविता विविध वाद्यांच्या साथीने म्हणणे व मुलांना म्हणावयास सांगणे.<br>२. चित्रपुस्तकातील चित्रांवर आधारित गोष्ट सांगणे.<br>३. मुलांना आवडणाऱ्या बडबडगीतांचे, कवितांचे, गोष्टींचे सादरीकरण करण्याची संधी देणे. | चित्रमय पुस्तके, बडबडगीते, कविता, गोष्टी |
| बालवाटिका १ | वाचन | चित्रवाचन विचार कल्पना | २. पुस्तके काळजीपूर्वक हाताळतो | १. मुलांना बडबडगीते, गाणी व गोष्टींची चित्रमय पुस्तके निवडण्याची व हाताळण्याची संधी देणे.<br>२. भरपूर चित्रे व कमी मजकूर असलेली गोष्टींची पुस्तके, शिक्षिकेने मुलांसोबत बसून स्वतः वाचणे व पुस्तकांची आवड मुलांच्या मनात निर्माण करण्यासाठी पुस्तकातील चित्रांशी बालकांचे दैनंदिन जीवन जोडणे.<br>३. वाचन कोपरा, आकर्षक वाचनालय यांसारख्या ठिकाणी तसेच वाढदिवस, दहीहंडी यांसारख्या प्रसंगी मुलांना पुस्तके देण्याची संधी निर्माण करणे.<br>४. मुलांना स्वतःचा पुस्तक संग्रह निर्माण करण्यासाठी प्रोत्साहन देणे. | चित्रमय पुस्तके, वाचनकोपरा, आकर्षक वाचनालय, पुस्तके |

ध्येय : CG-11 : मुले भाषा दोन (L2) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात.
क्षमता : C-11.1 : शब्दध्वनीची जाणीव होऊन शब्दध्वनी/ अक्षरे एकत्र करून शब्द तयार करतो व शब्दांमधील शब्दध्वनी/ अक्षरे वेगळी करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | नाही | नाही | १. या वयोगटासाठी अध्ययन निष्पत्ती नाही | नाही | नाही |

ध्येय : CG-11 : मुले भाषा दोन (L2) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात.
क्षमता : C-11.2 : लिपीतील वारंवार येणारी अक्षरे ओळखतो आणि या ज्ञानाचा उपयोग शब्द वाचन लेखनासाठी करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | नाही | नाही | १. या वयोगटासाठी अध्ययन निष्पत्ती नाही | नाही | नाही |

**विकासक्षेत्र : सौंदर्यात्मक आणि सांस्कृतिक विकास (आनंदमय कोश विकास)**

ध्येय : CG-12 : मुले दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.

क्षमता : C-12.1 : विविध आकाराच्या द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (3D) कलाकृती तयार करण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य आणि साधने हाताळतो व त्याबरोबर खेळतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | दृश्यकला | कलासाधने हाताळणे | १. योग्य कलासाहित्य, साधने आणि उपकरणे हाताळतो. | १. कलेसाठी लागणारी विविध साधने शिक्षिकेने प्रत्यक्ष कृती करून ती कशी हाताळावीत हे दाखवणे.<br>२. कलेसाठी लागणारी विविध साधने मुलांना हाताळण्यास देणे.<br>उदा. कागद सरळ फाडणे, खडूने गिरगिटणे, मेणाच्या रंगाने आकृती रंगवणे, मातीचे गोळे करणे, मळलेल्या पिठाला आकार देणे, ठसेकाम करणे इत्यादी.<br>३. प्रारंभी मुलांना मुक्तपणे कलेची साधने वापरण्याची संधी देणे.<br>४. कलासाधने वापरताना घ्यायच्या काळजीसंबंधी सूचना देणे. | कागद, खडू, मेणाचे रंग, माती, पीठ, ठसेकामाच्या वस्तू |
| बालवाटिका १ | दृश्यकला | दिव्मितीय त्रिमितीय प्रतिमा शोधणे | २. दृश्य कलाकृतींमध्ये ठसे, रेघा आणि इतर द्विमितीय (2D) आणि त्रिमितीय (2D) प्रतिमा तयार करताना लहान व मोठे आकार शोधतो. | १. द्विमितीय प्रतिमेत रंग देताना, ठसेकाम करताना, चिकटकाम करताना लहान, मोठ्या आकारांचा समावेश करणे.<br>उदा. कागदाचा बोळा करून, लहान वर्तुळ ठसे वापरून रंगविणे. लहान–मोठ्या गोळ्यांचा वापर करणे.<br>२. वाळूत किंवा मातीत काडीने वेगवेगळ्या आकाराच्या रेघोट्या मारणे.<br>३. कागदावर लहान–मोठ्या टिकल्या चिकटवणे.<br>४. रंगीत कागद फाडून त्याचे तुकडे दिलेल्या आकारात चिकटवणे.<br>५. पेटीवर (बॉक्स) लहान–मोठे स्टार चिकटवणे. | कागदाचे बोळे, रंग |
| बालवाटिका १ | दृश्यकला | ठसेकाम आकृती | ३. साहित्य एकत्रित मिसळून छाप व आकृती तयार करतो. | १. भेंडी, कांदा, बटाटा यांची कापे रंगात बुडवून त्यांचे ठसे उमटवणे.<br>२. कागदाच्या बोळ्याला दोरा गुंडाळून वेगवेगळ्या रंगांचे व आकारांचे ठसे उमटवणे.<br>३. ओल्या मातीचे व मळलेल्या पिठाचे वेगवेगळे आकार तयार करून त्यावर विविध वस्तूंचे ठसे उमटवणे. | भेंडी, कांदा, बटाटा, कागद, दोरा, माती, पीठ, पाणी |
| बालवाटिका १ | दृश्यकला | ठसेकाम | ४. ब्लॉक्स, स्टेन्सिल, सापडलेल्या वस्तू आणि नैसर्गिक साहित्य यांचे ठसे उमटवतो. | १. बांगडी, ठोकळे, स्टेन्सिल, खोडरबर यांसारखे साहित्य गोळा करून त्यांचे विविध रंगातील ठसे जुन्या वर्तमानपत्रावर, कागदावर उमटवणे. | बांगडी, ठोकळे, स्टेन्सिल, खोडरबर, वर्तमानपत्रे, कागद |

ध्येय : CG-12 : मुले दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.
क्षमता : C-12.2 : संगीत, भूमिकाभिनय, नृत्य आणि विविध हालचाली यांची निर्मिती करण्यासाठी स्वतःचा आवाज, शरीर, जागा आणि विविध वस्तू यांचा चौकसपणे उपयोग करतो व खेळतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | आवाज/ ध्वनी | आवाज निर्मिती तालबद्धता | १. स्वतःच्या आवाजाचा आणि शरीराचा वापर करून तालबद्धतेचा शोध घेतो. (टाळ्या, चुटक्या, पावलांचा आवाज, हाताच्या लयबद्ध हालचाली, उड्या, बडबडगीतातील शब्दोच्चार) | १. बडबडगीत, गाणे, कविता म्हणताना त्याला जुळतील अशा पद्धतीने टाळ्या वाजवणे/ चुटक्या वाजविणे.<br>२. तोंडाने विविध तालबद्ध आवाज काढणे.<br>उदा. १. ओठांचा वापर करून प, प, प, असा आवाज<br>२. जीभेचा वापर करून टण्, टण्, टण् असा आवाज.<br>३. घुमचे कटर घुम्<br>घुमचे कटर घुम्<br>घुमचे कटर घुम्<br>घुमचे कटर घुम्<br>३. शारीरिक अवयवांचा वापर करून तालात विविध शारीरिक हालचाली करणे.<br>उदा. १. जमिनीवर पावले वाजवणे.<br>२. कमरेवर हात ठेवून डोलणे.<br>३. हात वर, खाली, बाजूला करणे. | बडबडगीत, गाणे, कविता |
| बालवाटिका १ | आवाज | आवाज निर्मिती | २. स्वतःचा आवाज, शरीर, वस्तू आणि वाद्यांचा वापर करून विविध ध्वनी निर्माण करणे. | १. प्राण्यांचे व पक्ष्यांचे तोंडाने आवाज काढणे.<br>उदा. १. म्यांव - म्यांव - म्यांव<br>२. काव - काव - काव<br>३. भू - भू - भू<br>४. हसण्याचा आवाज<br>५. रडण्याचा आवाज<br>२. शरीर अवयवांचा वापर करून विविध आवाज काढणे.<br>उदा. टाळ्या वाजवणे, चुटकी वाजवणे, पाय आपटणे, हात आपटणे, हाताने बाकावर आवाज करणे, बाकावर बोट/ एकाहून अधिक बोटे वापरून आवाज करणे, दंडावर थोपटणे, मांडीवर थोपटणे.<br>३. वस्तूंचा वापर करून आवाज काढणे.<br>उदा. पेन, पेन्सिल, पट्टी, टेबल, भांडे, चमचा, वाटी, पेला, डबा, दाराची कडी, काठ्या इत्यादी.<br>४. वाद्यांचा वापर करून आवाज निर्माण करणे. उदा. खंजिरी, टाळ, घुमट, घुंगरू, डफ, बासरी इत्यादी. | बाक, पेन, पेन्सिल, पट्टी, टेबल, भांडे, चमचा, वाटी, पेला, डबा, दाराची कडी, काठ्या |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | आवाज | आवाजातील चढउतार, पट्टी | ३. आवाज, शरीर, वस्तू यांचा वापर करताना किंवा साधनांबरोबर खेळताना आवाजाची मात्रा (लहान आणि मोठा) आवाजाची पट्टी (तीव्र आणि मृदू) यांच्याबरोबर प्रयोग करतो. | १. 'वंदे मातरम्'सारख्या घोषणा देणे.<br>२. मित्राला/ मैत्रिणीला दूर उभे करून हाक मारणे. नंतर जवळ बोलावून हाक मारणे.<br>३. पेला, तांब्या किंवा एखादे भांडे तोंडासमोर धरून बोलणे. तोंडासमोर काहीही न धरता बोलणे.<br>४. खालील प्रकारे बोलून त्यातील फरक स्पष्ट करणे. उदा. ओरडणे, हळू बोलणे, कुजबुजणे. | घोषणा, पेला, तांब्या, भांडे |
| बालवाटिका १ | योग | शांतता, स्थिरता | ४. रोजच्या प्रसंगामध्ये शांतता आणि स्थिरता यांचा वापर करतो. | १. प्रार्थनेच्या वेळी स्थिर व शांत बसणे.<br>२. राष्ट्रगीत चालू असाताना स्थिर उभे राहणे.<br>३. डोळे मिटून शांत व स्थिर बसणे.<br>४. 'पुतळा' (स्टॅच्यू) हा खेळ खेळणे.<br>५. सावधान' व 'विश्राम' करणे.<br>६. न सांडता बाटलीत पाणी भरणे.<br>७. दीप प्रज्वलन करणे. | प्रार्थना, राष्ट्रगीत, खेळ, बाटली, पाणी, दिवा |

ध्येय : CG-12 : मुले दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.
क्षमता : C-12.3 : बालक कलेच्या माध्यमातून स्वतःच्या कल्पना आणि भावना व्यक्त करण्यासाठी सर्जनशीलता व कल्पकतेचा उपयोग करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | शिल्प | क्षेत्रभेट | १. परिसर, स्थानिक संस्कृती आणि कलेचे नमुने यांचे निरीक्षण करतो आणि त्याचा स्वअभिव्यक्तीशी सहसंबंध जोडतो. | १. परिसरातील सांस्कृतिक, ऐतिहासिक स्थळांना भेट देणे. शिल्प, बांधकाम, इतिहास यांविषयी संभाषण.<br>२. दृक्‌श्राव्य माध्यमातून छायाचित्रे दाखवून सांस्कृतिक आणि ऐतिहासिक स्थळांची, शिल्पांची माहिती देणे.<br>३. कला आणि संस्कृती यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम पाहणे. मुलांना अशा कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी देणे. | सांस्कृतिक, ऐतिहासिक स्थळे, शिल्पे, दृक्‌श्राव्य माध्यमे, सांस्कृतिक कार्यक्रम |
| बालवाटिका १ | कला | नृत्य, संगीत | २. वस्तू, व्यक्ती आणि भावनिक अनुभव यांची प्रतिकात्मक अभिव्यक्ती करण्यासाठी विविध दृश्य, प्रतिमा, शारीरिक हालचाली आणि आवाज निर्माण करतो. | १. वाद्याच्या तालावर मुक्तपणे सर्जनशील हालचाली व मुद्रा करणे.<br>२. रस्त्यावरील वस्तू विक्रेता, ट्रॅफिक पोलीस यांसारख्या भूमिका सादर करणे.<br>३. हसण्याचा, रडण्याचा, रागावण्याचा अभिनय करणे.<br>४. डबा, ताट, वाटी, चमचा यांसारख्या वस्तू वापरून सर्जनशील ध्वनी निर्माण करणे. आवाज वाढवणे, कमी करणे, गती वाढवणे, कमी करणे. | वाद्यांची धून, मोबाईल, डबा, ताट, वाटी, चमचा |

ध्येय : CG-12 : मुले दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.
क्षमता : C-12.4 : कला माध्यमामध्ये सहयोगाने काम करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | कला | नाट्य, चित्र, नक्षीकाम | १. व्यक्तिशः किंवा गटात विविध आवाज किंवा हालचाली यांचे प्रयोग करतो. | १. छोट्या गटात हातात पाने धरून झाडे झुलण्याचे दृश्य सादर करणे.<br>२. हातात काठी धरून नाव वल्हविण्याचा अभिनय व हावभाव करणे.<br>३. व्यक्तिशः/ गटात विविध वाद्ये वाजविण्याची कृती करणे. (खंजिरी, घुमट, डबा, काठी, पेला, वाटी, चमचा इत्यादी)<br>४. परिसरातील प्राणी, पक्षी यांचे आवाज काढणे व त्यांच्यासारख्या हालचाली करणे.<br>५. एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून 'धालो' नृत्यासारखे पुढे जाणे व मागे येणे. धालो नृत्याच्या एकदोन ओळी नृत्य करताना म्हणणे. | पाने, काठी, धालोनृत्य, गीत, खंजिरी, घुमट, डबा, पेला, वाटी, चमचा |

ध्येय : CG-12 : मुले दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.
क्षमता : C-12.5 : विविध कला, स्थानिक संस्कृती आणि वारसा यांची निर्मिती करताना आणि अनुभव घेताना विविध प्रकारच्या प्रतिक्रियांना प्रतिसाद देतो व प्रशंसा करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | कला | रसग्रहण अभिव्यक्ती | १. कलाकृतींबाबत आवडनिवड व इतर मते व्यक्त करताना शाब्दिक/ अशाब्दिक प्रतिसाद देतो. | १. नाटिकेतील भूमिका आवडल्यास स्वतः टाळ्या वाजवणे. नाटिका संपल्यावर आवडलेले वाक्य, शब्द स्वतः म्हणणे.<br>२. चित्रातील रंग, आकार यांविषयी मुलांना मत व्यक्त करण्याची संधी देणे.<br>३. मुलांनी संभाषणात चित्र, नक्षीकाम, नाटिका यांविषयी बोलणे. | नाटिका, चित्रे, नक्षीकाम |
| बालवाटिका १ | कला | सहयोग | २. कलेशी संबंधित कृतीमध्ये इतरांच्या उपस्थितीची दखल घेतो. | १. गटशः केलेल्या मुक्त हालचालीच्या नृत्यात इतरांच्या हालचालींना सकारात्मक प्रतिसाद देणे.<br>२. गटशः ठोकळ्यांची रचना करताना इतरांना सहकार्य करणे.<br>३. गटशः कोलाजकाम, ठसेकाम करताना इतरांना पूरक कृती करून कलाकृती सुंदर बनविण्याचा प्रयत्न करणे. | नृत्य, ठोकळे, कोलाजकमासाठी आवश्यक साहित्य, ठसेकामासाठी आवश्यक साहित्य |

**विकासक्षेत्र : सकारात्मक अध्ययन सवयी (मनोमय आणि विज्ञानमय कोश विकास)**

ध्येय : CG-13 : मुले अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. त्यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.

क्षमता : C-13.1 : अवधान आणि हेतुपुरस्सर कृती : विशिष्ट ध्येय प्राप्तीसाठी नियोजन, अवधान केंद्रीकरण मार्गदर्शित कृती करणे, अशी कौशल्ये संपादित करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | सकारात्मक सवयी | एकाग्रता | १. कमी कालावधीसाठी स्वतःच्या कृतीवर लक्ष केंद्रित करतो. (उदा. कोडी सोडवणे) | १. ठोकळ्यांचा मनोरा रचणे.<br>२. चित्रांचे कापलेले दोन-तीन भाग एकत्र ठेवून चित्र तयार करणे.<br>३. रंगांच्या जोड्या लावणे.<br>४. डोळे मिटून परिसरातील आवाज ऐकणे. | ठोकळे, चित्रांचे कापलेले भाग, रंग |
| बालवाटिका १ | सकारात्मक सवयी | एकाग्रता, अभिरुची | २. गुंतवून ठेवणाऱ्या एक किंवा दोन कृतींमध्ये अभिरुची टिकवून ठेवतो. (उदा. ५-१० मिनिटांसाठी ज्ञानेंद्रियाला चालना देणाऱ्या साहित्याबरोबर खेळतो.) | १. चित्र रंगविणे.<br>२. मणी दोऱ्यात ओवणे.<br>३. ठसेकाम करणे.<br>४. कोलाजकाम करणे.<br>५. चित्रपुस्तकातील चित्रांचे निरीक्षण करणे. | रंग, कागद, मणी, दोरा, कांदा, भेंडी, बटाटा, रंग, बिया, खडे, फुले, पाने, चित्रपुस्तक |

ध्येय : CG-13 : मुले अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. त्यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.

क्षमता : C-13.2 : स्मृती आणि मानसिक लवचिकता : संरचित वातावरणामध्ये अध्ययन सुलभ होण्यासाठी योग्य कार्यकारी स्मृती, मानसिक लवचिकता (योग्य प्रकारे अवधान केंद्रित होणे किंवा बदलणे), स्वयंनियंत्रण (आवेगात्मक कृती किंवा प्रतिसाद रोखणे) विकसित करतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | सकारात्मक सवयी | स्मरणशक्ती विकास | १. गोष्ट आठवून सांगणे किंवा समोर नसणाऱ्या चित्राचे वर्णन करणे, यांसारख्या कृतींच्या माध्यमातून लक्षात ठेवण्याचा सराव करतो. | १. परिचित गोष्ट सांगणे.<br>२. परिचित गाणे म्हणणे.<br>३. संभाषणात मुलांना घरी घडलेले प्रसंग आठवून सांगण्याची संधी देणे.<br>४. स्थळभेट झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी आपण काय बघितले ते मुलांना सांगण्याची संधी देणे.<br>५. चित्रफित दाखविणे. ती दाखवून झाल्यानंतर त्यासंबंधी गप्पागोष्टी करणे.<br>६. वस्तू प्रथम मुलांना दाखवणे. नंतर त्या कपड्याने झाकून स्मरणशक्तीचा खेळ घेणे. | गोष्ट, गाणे, ऐतिहासिक, सांस्कृतिक स्थळे, चित्रफित, वस्तू, कपडा |
| बालवाटिका १ | सकारात्मक सवयी | स्मरणशक्ती | २. परिचित वातावरणामध्ये साहित्य कुठे ठेवले आहे ते आठवतो. (कपाटातील जास्तीचा कपडा काढून दाखवतो.) | १. अध्ययन कोपऱ्यातील एखादे खेळणे आणणयास सांगणे.<br>२. चित्रपुस्तकात ठेवलेले पत्रक घरी आईला देण्यास सांगणे. | खेळणे, पत्रक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | सकारात्मक सवयी | स्वयं नियंत्रण | ३. दैनंदिन कामकाजाच्या बदलांबरोबर समायोजन करतो. | १. अडथळे पार करून पुढे जाण्याचा खेळ खेळणे. चालण्याच्या मार्गात मध्ये टायर, विटा, छोटे भुयार यांसारखे अडथळे ठेवणे.<br>२. क्रियाकलाप घेताना अध्ययन कोपऱ्यात, अर्धवर्तुळात, रांगेत इत्यादी विविध पद्धतीने बसण्याची संधी देणे.<br>३. वर्गात खडूने आखलेल्या रस्त्यावरून गाडी चालवण्याचा खेळ खेळणे. वाहतुकीच्या सूचनांप्रमाणे कृतीत बदल करणे. (उदा. डावे वळण, उजवे वळण, हिरवा दिवा, लाल दिवा इत्यादी) | टायर, विटा, खडू, सूचनाफलक |
| बालवाटिका १ | सकारात्मक सवयी | मानसिक लवचिकता | ४. दोन कृतींमधील बदलाच्या खुणा ओळखतो. | १. गोलाकार बसून 'नायकाच्या' (leader) कृतीप्रमाणे आपण कृती बदलणे.<br>२. नृत्य करताना शिक्षिकेच्या कृतीप्रमाणे आपण कृती करणे. | खेळ, नृत्य |
| बालवाटिका १ | सकारात्मक सवयी | मानसिक लवचिकता | ५. दिनचर्येतील बदलांसोबत समायोजन करतो. | १. निसर्गभ्रमण, स्थळभेट यांसारखे नेहमीच्या दिनचर्येत बदल करणारे उपक्रम घेणे.<br>२. संध्याकाळी सादर होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमात, उत्सवात मुलांना सहभागी होण्याची संधी देणे. | निसर्गभ्रमण, ऐतिहासिक सांस्कृतिक स्थळे, सांस्कृतिक कार्यक्रम, उत्सव |
| बालवाटिका १ | सकारात्मक सवयी | शिस्त, नियम पालन | ६. प्रौढ व्यक्तींच्या सहकार्याने अल्पकालावधीसाठी आळीपाळीने संधी घेतो व रांगेत वाट पाहण्याची सुरुवात करतो. | १. खाण्याचे पदार्थ वाटताना आपली पाळी येईपर्यंत रांगेत उभे राहणे.<br>२. क्रियाकलाप करताना, खेळताना आपली पाळी येईपर्यंत वाट पाहणे. | पदार्थ, क्रियाकलाप |

ध्येय : CG-13 : मुले अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. त्यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.
क्षमता : C-13.3 : निरीक्षण, आश्चर्य, कुतुहल आणि शोध : वस्तूंच्या सूक्ष्म बारकाव्याचे निरीक्षण करतो, विविध ज्ञानेंद्रियांचा वापर करून शोध घेतो व आश्चर्य दर्शवतो, वस्तू हाताळतो आणि प्रश्न विचारतो.

| स्तर/ इयत्ता | घटक | उपघटक | अध्ययन निष्पत्ती | अध्ययन अनुभव | अध्ययन साधने |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | सकारात्मक सवयी | निरीक्षण, कुतुहल, शोध | १. बागेमध्ये किंवा इतर बाहेरच्या ठिकाणी आनंदाने वेळ घालवतो. | १. बागेत, प्राणिसंग्रहालयाच्या स्थानी, गावातील नदीकाठी, समुद्रकिनाऱ्यावर आनंदाने फिरणे.<br>२. झाडाच्या जमिनीजवळच्या फांदीला हात धरून किंवा दोरी बांधून लोंबकळणे.<br>३. बागेतील झोपाळ्यावर झुलणे, घसरगुंडीवरून घसरणे व इतर खेळ खेळणे.<br>४. निसर्गभ्रमण करताना झाडे, पाने, फुले, पक्षी, आकाश, ढग, फुलपाखरे यांचे निरीक्षण करणे व त्यांविषयी संभाषण करणे. | बाग, प्राणिसंग्रहालय, नदी, समुद्र, झाड, दोरी, झोपाळा, घसरगुंडी, खेळ, निसर्ग |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बालवाटिका १ | सकारात्मक सवयी | निरीक्षण, कुतुहल, शोध | २. प्रौढ व्यक्तींच्या मदतीने सभोवतालच्या परिसराचा शोध घेण्यासाठी कुतुहल दर्शवतो. | १. झाडे, पाने, फुले, नदी, समुद्र, ढग यांचे फोटो काढणे.<br>२. बहिर्गोल भिंगातून पाने, फुले, खडे यांचे निरीक्षण करणे व संभाषण करणे.<br>३. दुर्बिणीतून पक्षी, ढग, डोंगर, नदी, समुद्र यांचे निरीक्षण करणे. | झाडे, पाने, फुले, नदी, समुद्र, ढग, खडे, पक्षी, डोंगर, बहिर्गोल भिंग, दुर्बिण |
| ध्येय : CG-13 : मुले अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. त्यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.<br>क्षमता : C-13.4 : वर्गखोली नियामके : नियामके समजपूर्वक स्वीकारतो आणि त्यांचे पालन करतो. | | | | | |
| **स्तर/ इयत्ता** | **घटक** | **उपघटक** | **अध्ययन निष्पत्ती** | **अध्ययन अनुभव** | **अध्ययन साधने** |
| बालवाटिका १ | सकारात्मक सवयी | नियामकांचे पालन | १. वर्गातील नियामकांसाठी प्रौढ व्यक्तींच्या वर्तनाचे निरीक्षण आणि अनुकरण करतो. | १. शिक्षकांनी वर्गात नियामकांचे पालन स्वतः करून मुलांच्या निदर्शनास ते आणणे.<br>२. नियामकांविषयी मुलांशी संभाषण करणे.<br>३. बोलक्या बाहुल्यांच्या संवादातून नियामकांची माहिती देणे. | बोलक्या बाहुल्या |

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, पर्वरी–गोवा